POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

मराठी एकीकरण बातमीपत्र

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष-०५ ● अंक-३११ ● मुंबई, शनिवार, १३ जून २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

मकोकाची कारवाई नको असेल तर...

धडक कारवाईनंतर आता तुकाराम मुंढेंचा थेट इशारा

■ **बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक,**

सनदी अधिकारी तुकाराम मुंढे यांनी अन्न आणि औषध प्रशासनात (एफडीए) आयुक्तपदाची जबाबदारी सोपवल्यानंतर त्यांनी राज्यभरात धडक कारवाईला सुरुवात केली आहे. तुकाराम मुंढे यांच्या नेतृत्वाखाली अन्न व औषध प्रशासनाने राज्यातील प्रतिबंधित पान मसाला, गुटखा, भेसळ अन्नपदार्थांविरोधात राज्यभरातून कोट्यावधीचा साठा जप्त केला आहे. यानंतर आता तुकाराम मुंढे यांनी प्रतिबंधित अन्नपदार्थ विक्री करणाऱ्या गुन्हेगारांवर मकोका अंतर्गत कारवाई करणार असल्याचा इशारा दिला आहे.

तुकाराम मुंढे यांनी सांगितले की, महाराष्ट्र राज्यात सार्वजनिक आरोग्याच्या संरक्षणासाठी आणि प्रतिबंधित अन्नपदार्थांच्या संघटित अवैध व्यापाराला आळा घालण्यासाठी अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य यांचेमार्फत अत्यंत महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. गुटखा, तंबाखू किंवा निकोटीनयुक्त पानमसाला तसेच तत्सम तंबाखू-मिश्रित प्रतिबंधित अन्नपदार्थांचे उत्पादन, साठवणूक, वाहतूक, वितरण व विक्री करणाऱ्या संघटित नेटवर्क्सविरुद्ध पात्र प्रकरणांत महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम, 1999 म्हणजेच मकोका लागू करण्याबाबत सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांना आदेश दिले आहेत, अशी माहिती त्यांनी दिली.

तुकाराम मुंढे म्हणाले की, भारताच्या संविधानाच्या कलम 47 नुसार सार्वजनिक आरोग्य सुधारण्याची आणि आरोग्यास अपायकारक पदार्थांच्या सेवनास प्रतिबंध करण्याची जबाबदारी राज्यावर आहे. त्यामुळे गुटखा, तंबाखू किंवा



निकोटीनयुक्त पानमसाला आणि अशा प्रकारचे प्रतिबंधित पदार्थ हे सार्वजनिक आरोग्यास गंभीर धोका निर्माण करणारे आहेत.

या पार्श्वभूमीवर अन्न सुरक्षा व मानके अधिनियम, 2006 च्या कलम 30(2) (अ) अंतर्गत राज्यात अशा पदार्थांच्या उत्पादन, साठवणूक, वाहतूक, वितरण व विक्रीवर प्रतिबंध घालण्यात आलेला आहे. तथापि, प्रतिबंध असूनही काही ठिकाणी या पदार्थांचा अवैध व्यापार पद्धतशीर, संघटित आणि आर्थिक फायद्यासाठी होत असल्याचे अंमलबजावणी यंत्रणांच्या निदर्शनास आले आहे. तसेच काही प्रकरणांमध्ये केवळ किरकोळ विक्रेतेच नव्हे, तर उत्पादक, पुरवठादार, वित्तपुरवठादार, वाहतूकदार, गोदाम चालक, घाऊक विक्रेते, उप-विक्रेते आणि इतर सहायक घटक यांचा समन्वयित सहभाग असतो. अनेक वेळा बनावट कागदपत्रे, बनावट चलने, डमी कंपन्या, बेनामी व्यवहार, गुप्त गोदामे, आंतरराज्य पुरवठा साखळी, तसेच वाहतूक व वितरणासाठी विविध मार्गांचा वापर केला जातो. त्यामुळे अशा कारवाऱ्या केवळ अन्नसुरक्षा उल्लंघनापुरत्या मर्यादित न ठेवता, पात्र प्रकरणांत संघटित गुन्हेगारीच्या दृष्टीने तपासल्या जाणे अपेक्षित आहे.

तुकाराम मुंढे म्हणाले की, अन्न सुरक्षा व मानके अधिनियम, 2006 अंतर्गत असुरक्षित अन्नाचे उत्पादन, साठवणूक, वितरण किंवा विक्री करणे हा गंभीर गुन्हा आहे. सदर अधिनियमाच्या कलम 59 अंतर्गत अशा गुन्ह्यांसाठी कारावासाची तरतूद आहे. कलम 64 अंतर्गत पुनरावृत्ती झाल्यास वाढीव शिक्षेची तरतूद आहे. तसेच कलमे 38 व 41 नुसार अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांना तपासणी, शोध व जप्तीचे अधिकार देण्यात आले आहेत. कलम 42 अंतर्गत अभियोजन सुरू करण्याची प्रक्रिया नमूद आहे. महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम, 1999 अंतर्गत ''सतत चालणारी बेकायदेशीर कृती'', ''संघटित गुन्हा'' आणि ''संघटित गुन्हेगारी सिंडिकेट'' याबाबत स्पष्ट तरतुदी आहेत. जर एखादा गुन्हा दखलपात्र असून तीन वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक शिक्षेस पात्र असेल, मागील दहा वर्षांत एकापेक्षा अधिक आरोपपत्रे दाखल झालेली असतील आणि न्यायालयाने त्यांची दखल घेतलेली असेल, तसेच दोन किंवा अधिक व्यक्ती आर्थिक लाभासाठी समन्वयाने कार्यरत असतील, तर अशा प्रकरणात मकोका लागू करण्याची पात्रता तपासून कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत, अशी माहिती तुकाराम मुंढे यांनी दिली.

प्रतिबंधित अन्नपदार्थांचा अवैध व्यापार संघटित गुन्हा म्हणून हाताळणार

तुकाराम मुंढे म्हणाले की, अन्न व औषध प्रशासनाने नागरिकांना आवाहन केले आहे की, गुटखा, तंबाखू किंवा निकोटीनयुक्त पानमसाला किंवा इतर प्रतिबंधित अन्नपदार्थांचे उत्पादन, साठवणूक, वाहतूक, वितरण किंवा विक्री होत असल्यास तत्काळ स्थानिक अन्न व औषध प्रशासन कार्यालय किंवा स्थानिक पोलीस यांना माहिती द्यावी. कायद्याचे पालन करणाऱ्या व्यापाऱ्यांना कोणताही त्रास देणे हा आमचा उद्देश नाही, मात्र सार्वजनिक आरोग्यास हानी पोहोचवून संघटित पद्धतीने प्रतिबंधित अन्नपदार्थांचा व्यापार करणाऱ्या व्यक्ती, संस्था आणि नेटवर्क्सविरुद्ध कठोर, पुराव्यांवर आधारित आणि कायदेशीरदृष्ट्या कठोर कारवाई केली जाईल. प्रतिबंधित अन्नपदार्थांचा अवैध व्यापार हा केवळ अन्नसुरक्षा उल्लंघन नसून, यापुढे तो सार्वजनिक आरोग्याविरुद्धचा गंभीर संघटित गुन्हा म्हणून हाताळला जाईल, असे तुकाराम मुंढे यांनी स्पष्ट केले.

गुटखा व्यवसाय करणाऱ्यांवर आता मकोका अंतर्गत कठोर कारवाई

■**मुंबई । प्रतिनिधी,**

"गुटखा व्यवसाय करणाऱ्यांवर मकोका लागू करता येईल अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपूरचे हिवाळी अधिवेशनात विधानसभेत दिली होती. त्यानुसार गुटखा उत्पादन, साठवणूक, वाहतूक, वितरण व विक्री करणाऱ्या संघटित साखळी कठोर कारवाई करण्यासाठी अन्न व औषध प्रशासन अत्यंत महत्त्वपूर्ण पाऊल टाकत आहे,"असे प्रतिपादन अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी केले आहे.

गुटखा, तंबाखू किंवा निकोटीनयुक्त पानमसाला तसेच तत्सम तंबाखू-मिश्रित प्रतिबंधित अन्नपदार्थांचे उत्पादन, साठवणूक, वाहतूक, वितरण व विक्री करणाऱ्या संघटित नेटवर्क्सविरुद्ध पात्र प्रकरणांत महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम, १९९९ म्हणजेच मकोका लागू करण्याबाबत सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांना अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांनी आज १२ जून २०२६ रोजी स्पष्ट आदेश दिले.यानुसार अन्न व औषध प्रशासन, पोलीस आणि संबंधित यंत्रणांच्या कारवायांमधून असे दिसून आले आहे की, काही प्रकरणांमध्ये केवळ किरकोळ विक्रेतेच नव्हे, तर उत्पादक, पुरवठादार, वित्तपुरवठादार, वाहतूकदार, गोदाम चालक, घाऊक विक्रेते, उप-विक्रेते आणि इतर सहाय्यक घटक यांचा समन्वयित सहभाग असतो.

अनेक वेळा बनावट कागदपत्रे, बनावट चलने, डमी कंपन्या, बेनामी व्यवहार, गुप्त गोदामे, आंतरराज्य पुरवठा साखळी, तसेच वाहतूक व वितरणासाठी विविध मार्गांचा वापर केला जातो. त्यामुळे अशा कारवाया केवळ अन्नसुरक्षा उल्लंघनापुरत्या मर्यादित न ठेवता, पात्र प्रकरणांत संघटित गुन्हेगारीच्या कारवाई केली जाणार आहे.

अन्न सुरक्षा व मानके अधिनियम, २००६ अंतर्गत असुरक्षित अन्नाचे उत्पादन, साठवणूक, वितरण किंवा विक्री करणे हा गंभीर गुन्हा आहे. सदर अधिनियमाच्या कलम ५९ अंतर्गत अशा गुन्ह्यांसाठी कारावासाची तरतूद आहे. कलम ६४ अंतर्गत पुनरावृत्ती झाल्यास वाढीव शिक्षेची तरतूद आहे. तसेच कलमे ३८ व ४१ नुसार अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांना तपासणी, शोध व जप्तीचे अधिकार देण्यात आले आहेत. कलम ४२ अंतर्गत अभियोजन सुरू करण्याची प्रक्रिया करण्यात येईल असे आदेशात नमूद आहे. राज्यात गुटखा बंदी असतानाही शाळा परिसर, महाविद्यालय परिसरांसह अनेक ठिकाणी गुटखा आढळून येतो. त्यामुळे गुटखा बंदी कायद्याची कडक अंमलबजावणी करण्यासाठी मकोका लागू करण्याचा यापूर्वी निर्णय शासनाने घेतला होता.

"महाराष्ट्र राज्यात सार्वजनिक आरोग्याच्या संरक्षणासाठी आणि प्रतिबंधित अन्नपदार्थांच्या संघटित अवैध व्यापाराला आळा घालण्यासाठी कायदयाची कठोर अंमलबजावणी करण्यात येईल" असे मंत्री नरहरी झिरवाळ यांनी सूचित केले आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याजवळ मद्यपान करणाऱ्यांना मनसेचा दणका...

■**मुंबई । प्रतिनिधी,**

मीरा रोडमधील काशीमिरा नाका परिसरात सार्वजनिक ठिकाणी मद्यपान करणाऱ्यांना महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या (मनसे) कार्यकर्त्यांनी चांगलाच दणका दिला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याजवळ उघडपणे मद्यपान करणाऱ्यांना मनसे सैनिकांनी जाब विचारत तेथून हाकलून लावल्याचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. स्थानिक नागरिकांच्या तक्रारीनुसार, काशीमिरा नाका परिसरातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याजवळ काही जण संध्याकाळी आणि रात्रीच्या वेळी वारंवार एकत्र येऊन मद्यपान करत होते. त्यामुळे महिला, ज्येष्ठ नागरिक आणि परिसरातून ये-जा करणाऱ्या नागरिकांना त्रास सहन करावा लागत होता. माहितीनुसार, या पार्श्वभूमीवर मनसे कार्यकर्त्यांनी संबंधित ठिकाणी अचानक जाऊन मद्यपान करणाऱ्यांना रोखले. तसेच, काहींना चोप देत तेथून हाकलून लावले.

व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल

या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. व्हिडीओमध्ये मनसे कार्यकर्ते सार्वजनिक ठिकाणी मद्यपान करणाऱ्या व्यक्तींना जाब विचारताना आणि त्यांना तेथून हटवताना दिसत आहेत.

मनसेचा इशारा

घटनेनंतर मनसेचे मीरा-भाईंदर शहराध्यक्ष संदीप राणे यांनी सार्वजनिक ठिकाणी मद्यपान करून नागरिकांना त्रास देणारे प्रकार खपवून घेतले जाणार नसल्याचे स्पष्ट केले. सार्वजनिक ठिकाणी मद्यपान करून कायदा व सुव्यवस्थेला बाधा आणणाऱ्यांविरोधात भविष्यातही मनसेकडून अशाच प्रकारची कारवाई करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.



जूनअखेरीस पावसाचा जोर वाढणार, त्यानंतर मान्सूनची गती कमी होणार

मुंबई : महाराष्ट्रासह देशभरातील नागरिक मान्सूनच्या जोरदार आगमनाची वाट पाहत आहेत. महाराष्ट्रासह देशाच्या अनेक भागांमध्ये मान्सूनचा वेग मंदावला असून पावसाची प्रतीक्षा कायम आहे. दरम्यान, ईशान्य भारतात मान्सूनच्या हालचालींना वेग आला आहे. आसाम, मेघालय, नागालँड आणि अरुणाचल प्रदेश या राज्यांमध्ये मान्सून पुढे सरकल्याचे दिसून येत आहे. भारतीय हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार, १८ जून ते २५ जून या कालावधीत मुंबई आणि कोकण किनारपट्टी परिसरात मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, २५ जून ते २ जुलै या कालावधीत राज्यातील अनेक भागांत मुसळधार पाऊस होण्याची शक्यता आहे. या आठवड्यात सरासरीपेक्षा जास्त पाऊस नोंदवला जाऊ शकतो. मात्र, २ जुलै ते ९ जुलै दरम्यान पावसाचे प्रमाण कमी राहण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. हवामान विभागाने चंद्रपूर जिल्ह्यासाठी वादळी पाऊस आणि जोरदार वाऱ्याच्या पार्श्वभूमीवर ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. या काळात वाऱ्याचा वेग ताशी ४० ते ५० किलोमीटर राहू शकतो. याशिवाय नाशिक आणि वर्धा जिल्ह्यांनाही ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. शनिवारी रायगड, सिंधुदुर्ग, सांगली, सोलापूर, बीड, नांदेड, लातूर, धाराशिव, भंडारा, गडचिरोली आणि गोंदिया या जिल्ह्यांसाठी वादळी पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. दुसरीकडे, वाशिम आणि यवतमाळ जिल्ह्यांसाठी उष्णतेचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर अकोला आणि अमरावती जिल्ह्यांना उष्णतेच्या लाटेचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. राज्यात पुढील काही दिवस हवामानात मोठे बदल होण्याची शक्यता असून नागरिकांनी हवामान विभागाच्या सूचनांचे पालन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

धोरण निर्मितीसाठी सांख्यिकी माहितीचा पाया मजबूत

कोकण व पुणे विभागीय सांख्यिकी प्रशिक्षण कार्यशाळा तळेगाव येथे संपन्न

■**नवी मुंबई । प्रतिनिधी,**

महाराष्ट्र शासनाच्या नियोजन विभागांतर्गत असलेल्या अर्थ व सांख्यिकी आयुक्तालयाद्वारे राज्यामध्ये प्रथमच आयोजित करण्यात येत असलेल्या नियतकालिक श्रमशक्ती सर्वेक्षण (PLFS) आणि असंघटित क्षेत्रातील उद्यमांचे वार्षिक सर्वेक्षण (ASUSE) या अत्यंत महत्त्वपूर्ण मोहिमेचा पाया घालणारी विभागीय प्रशिक्षण कार्यशाळा राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था (NIPHT), तळेगाव दाभाडे येथे नुकतीच यशस्वीरीत्या संपन्न झाली आहे.

कोकण व पुणे विभागातील क्षेत्रीय कामासाठी नियुक्त केलेल्या अन्वेषक व पर्यवेक्षकांसाठी दि. ०५ जून २०२६ ते १० जून २०२६ या कालावधीत ही पाच दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती, ज्याचे उद्घाटन अर्थ व सांख्यिकी आयुक्तालय, मुंबईच्या आयुक्त डॉ. ज्योत्स्ना पडियार (भा.प्र.से.) यांच्या हस्ते झाले. एप्रिल २०२६ ते मार्च २०२७ या कालावधीत चालणाऱ्या या संपूर्ण सर्वेक्षणांतर्गत संपूर्ण महाराष्ट्र राज्यामध्ये एकूण ६ हजार ८२८ नमुना घटकांचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून, हे काम २७६ अन्वेषक व निरीक्षकांमार्फत पूर्ण केले जाणार आहे. यामध्ये प्रामुख्याने कोकण व पुणे विभागाचा विचार करता, शहरी आणि ग्रामीण भाग मिळून एकूण २ हजार ९५६ नमुना घटकांचे सर्वेक्षण निश्चित करण्यात आले असून, हे उद्दिष्ट ७५ अन्वेषक आणि २८ पर्यवेक्षकांच्या पथकाद्वारे पूर्ण केले जाईल.

या महत्त्वपूर्ण उद्घाटन प्रसंगी मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रभारी जिल्हाधिकारी गजानन पाटील यांनी ऑनलाइन व्हिडिओ प्रणालीद्वारे उपस्थित राहून आपले मार्गदर्शनपर विचार मांडले. त्यांनी स्पष्ट केले की, या दोन्ही सर्वेक्षणांतून गोळा होणारी आकडेवारी ही ग्रामपातळी, जिल्हा आणि थेट विभागस्तरावरील विविध कल्याणकारी योजना व अचूक धोरण निर्मितीसाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे, त्यामुळे नागरिकांनी प्रगणकांना अचूक माहिती देऊन सहकार्य करावे. 'विकसित भारत @ २०४७' चे ध्येय साध्य करण्यासाठी आणि पुराव्यांवर आधारित डेटाचा (एव्हिडन्स बेस्ड डेटा) उपयोग करून शासनाला धोरणात्मक निर्णय घेणे सोपे जावे, या दृष्टीने हा प्रशिक्षण कार्यक्रम म्हणजे सर्वेक्षणाच्या यशस्वी अंमलबजावणीची एक भक्कम पायाभरणी असल्याचे प्रतिपादन राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय (NSO FOD) पुणे येथील सहसंचालक डॉ. रुही कुलकर्णी यांनी केले.

सेवानिवृत्त अतिरिक्त महासंचालक अशोक टोपराणी यांनी देशाच्या एकूणच आर्थिक प्रगतीचे मोजमाप करण्यामध्ये या दोन्ही सांख्यिकी सर्वेक्षणांचे अनन्यसाधारण महत्त्व अधोरेखित केले.

कार्यक्रमाच्या मुख्य अतिथी व आयुक्त डॉ. ज्योत्स्ना पडियार यांनी अधिक सविस्तर माहिती देताना सांगितले की, 'विकसित भारत @ २०४७' नुसार आता जिल्हा हे विकासाचे मुख्य केंद्र बनले आहे. त्यामुळे जिल्हास्तरीय रोजगार-बेरोजगार आकडेवारी, असंघटित क्षेत्रातील उद्योगांची अचूक संख्या आणि रोजगार निर्मिती यांसारख्या निर्देशकांची सांख्यिकीय माहिती याद्वारे उपलब्ध होईल, जी राज्य व जिल्ह्याचा उत्पन्नाचा अंदाज तयार करण्यास आणि शासनाच्या विविध योजना आखण्यास उपयुक्त ठरेल. या पाच दिवसीय निवासी प्रशिक्षणादरम्यान 'Ipsos Research Pvt. Ltd. Mumbai' या बाह्यसंस्थेकडून नियुक्त करण्यात आलेल्या प्रगणक व पर्यवेक्षकांना रोजगाराची रचना, कामगार सहभाग दर, तसेच असंघटित क्षेत्रातील उद्योगांचे स्वरूप, आर्थिक स्थिती, उत्पन्न व खर्च यांसारख्या तांत्रिक संकल्पनांचे सखोल ज्ञान देण्यात आले, तसेच 'CAPI' तंत्रज्ञानाचा वापर करून 'Tablet' वर थेट माहितीची अचूक नोंदणी कशी करावी याचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक व प्रशिक्षण देण्यात आले.

या भव्य प्रशिक्षण सोहळ्याच्या व्यासपीठावर मुख्य कार्यालयाचे सहआयुक्त भीष्म बिरादार, विभागीय आयुक्त कार्यालय पुणेचे सहआयुक्त (नियोजन) संजय मरकळे, जिल्हा नियोजन अधिकारी किरण इंदलकर, जिल्हा सांख्यिकी कार्यालयाच्या उपआयुक्त प्रियांका बोकील आणि इप्सॉस (Ipsos) संस्थेच्या संचालक तृप्ती शर्मा प्रामुख्याने उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात अर्थ व सांख्यिकी आयुक्तालय, कोकण विभागाचे सहआयुक्त जयसिंग मेहेत्रे यांनी केलेल्या प्रास्ताविकाने झाली, तर संपूर्ण कार्यशाळेचे आभार प्रदर्शन प्रादेशिक कार्यालय पुणे येथील प्रभारी सहआयुक्त वृषाली माकर यांनी केले.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक बांधकाम विभाग

ई मेल पत्ता :- thane2.ee@mahapwd.gov.in दुरध्वनी / फॅक्स क्रमांक :- ०२२-२५३६१३९३

ई निविदा सुचना क्रमांक ०६ सन २०२६-२७

कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग क्र. २, ठाणे जिल्हा ठाणे महाराष्ट्र शासननाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडे योग्य त्या वगार्तील **फक्त ठाणे जिल्ह्यातील नोंदणीकृत मजुर सहकारी सोसायटीकडून** खालील कामांकरिता **ब-१** नमुन्यातील निविदा ई- निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा http://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्याकरिता उपलब्ध आहेत. (वरीलपैकी काही अथवा सर्व निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग क्र. २, ठाणे यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.)

कामाचे नांव :- १) अंबरनाथ तालुक्यातील उपजिल्हा रुग्णालय बदलापूर येथे मुख्य इमारतीचे रंगकाम करणे. (डिपीडिसी वर्क) , **अंदाजित किंमत :- रु. १२,५९,७२१/-**

२) अंबरनाथ तालुक्यातील उपजिल्हा रुग्णालय बदलापूर येथे बाह्य रुग्ण इमारतीचे बांधकाम करणे. (डिपीडिसी वर्क) , **अंदाजित किंमत :- रु. १२,४५,०२०/-**

३) शहापूर तालुक्यातील भातसा नदी येथे गणेश घाटाचे बांधकाम करणे. (पर्यटन विकास कार्यक्रम), **अंदाजित किंमत :- रु ४१,०७,१९४/-**

४) मुरबाड तालुक्यातील गोरखगड खोपीवली पर्यटन अंतर्गत मौजे खोपीवली अंतर्गत रस्ता तयार करणे. (पर्यटन विकास कार्यक्रम), **अंदाजित किंमत :- रु ४१,५०,५८२/-**

५) मुरबाड तालुक्यातील गोरखगड खोपीवली पर्यटन अंतर्गत खोपीवली येथील मुख्य रस्ता ते रामचंद्र भांडे यांच्या घरापर्यंत रस्ता तयार करणे (पर्यटन विकास कार्यक्रम), **अंदाजित किंमत :- रु ४१,५०,५८२/-**

६) शहापूर तालुक्यातील तुंगेश्वरवाडी रस्त्यावरील साकव लगत भिंत बांधणे. (एकात्मिक आदिवासी विकास साकव कार्यक्रम) , **अंदाजित किंमत :- रु ४१,५७,८६७/-**

ई-निविदा उपलब्ध कालावधी :- **दि. १६/०६/२०२६ ते दि. २३/०६/२०२६**
ई-निविदा उघडणे :- **दि. २५/०६/२०२६**

खालील संकेतस्थळांवर ई-निविदांची सर्व माहिती उपलब्ध आहे.
१) http:// / mahapwd.com
२) http:// /mahatenders.gov.in
(सदर निविदेसुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील संकेतस्थळांवर कळविण्यात येईल.)
३) कार्यकारी अभियंता, सा.बा. विभाग क्र. २, ठाणे कार्यालयातील सूचना फलक
४) ई निविदा पोर्टलवर बीड लॉक झाल्यानंतर निविदांबाबत निविदेमध्ये नमुद कागदपत्रांच्या हार्ड कॉपी १ (एक) प्रतीत कंत्राटदारांनी निविदा सुचनेनुसार नमुद वेळेपूर्वी सादर करणे अनिवार्य राहिल.

जा.क्र.साबांविक्र.२/ठाणे/ई-निविदा/२०२६-२७/३०६३
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, सा.बां. विभाग क्र. २, ठाणे,
पार्किंग प्लाझा बिल्डींग ९ वा मजला, सर्विस रोड,
पूर्व द्रुतगती महामार्गलगत ज्युपिटर हॉस्पिटल जवळ, ठाणे - ४०० ६०१.
दिनांक :- **११/०६/२०२६**

सही
कार्यकारी अभियंता
सा.बा. विभाग क्र. २, ठाणे,



संपादकीय


संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

सारे काही अधिकारांसाठी, अधिकाऱ्यांसाठी...!

मंत्रालयात सध्या असलेल्या ३३ विभागांची संख्या लवकरच ४५ होईल. सत्ता नेमकी कोणासाठी आणि कशासाठी वापरायची असते हे नक्की ठरले तर नवे कायदे, नियम करण्याचीसुद्धा गरज भासणार नाही. पण कालाय तस्मै नमः हेच खरे.

मंत्रालयात आज ३३ विभाग आहेत, ते लवकरच ४५ होतील. पूर्वी ते २०-२५ होते. विभाग कमी होते तेव्हा लोक शासनव्यवस्थेबाबत समाधानी नव्हते व आज ३३ असल्याने आहेत, असेही ठामपणे म्हणता येत नाही. कारण, मंत्रालयाच्या वरच्या मजल्यांवरून कोणी उड्या घेऊ नयेत म्हणून जाळ्या लावल्या आहेत. मग विभाग स्वतंत्र केल्याने काय होणार हा प्रश्न निर्माण होतो. याचे उत्तर शोधल्यास प्रशासकीय सुलभता व सुटसुटीतपणा यापेक्षा राजकारण प्रभावी असल्याचे दिसू लागते. १९६० नंतरच्या काही दशकांत मंत्रीमंडळ सदस्यांची संख्याही बेताचीच असे. एकपक्षीय सरकारे असल्याने ते शक्य होते. पण १९९५ मध्ये प्रथमच शिवसेना-भाजपा युतीचे सरकार सत्तेवर आले तेव्हा मंत्रीसंख्या पक्षनिहाय विभागली गेली. खात्यांचे विभाजन होण्यास तेव्हा सुरुवात झाली. जळगावचे मातब्बर नेते सुरेश जैन यांच्यासाठी खास व्यापार आणि वाणिज्य खाते तयार झाले तेव्हा त्याची प्रशासकीय रचना उद्योग विभागाची होती. उद्योग विभाग लीलाधर डाके यांच्याकडे होता. तेव्हा अधिकाऱ्यांनी कोणाचे ऐकायचे हा संभ्रम काही काळ होता. पुढे १९९९ मध्ये काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेसचे सरकार सत्तेवर आले. तेव्हा खात्यांचे विभाजन अधिक वाढले. शासकीय विभागातून महामंडळे वेगळी काढून त्यासाठी स्वतंत्र मंत्री आले. सार्वजनिक बांधकाम विभागातून महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ व पाटबंधारे विभागातून महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ वेगळे काढून त्यासाठी वेगळे मंत्री आले. पूर्वी सार्वजनिक आरोग्य, वैद्यकीय शिक्षण, संशोधन आणि औषधीद्रव्ये हे एकच खाते होते. त्याचे तीन तुकडे झाले. आरोग्यमंत्री, वैद्यकीय शिक्षणमंत्री आणि अन्न आणि औषध प्रशासन मंत्री वेगळे झाले. वैद्यकीय प्रशिक्षण, संशोधन व चाचणी आणि जीव-औषध निर्मिती यासाठी दोन हाफकीन संस्था आहेत. यातील कोणता उपक्रम कोणत्या मंत्र्यांकडे, याची माहिती फारच कमी लोकांना असेल. तेच पाटबंधारे म्हणजेच जलसिंचन विभागाबाबत झाले. आता गोदावरी मराठवाडा व कृष्णा खोरे आणि तापी, विदर्भ आणि कोकणसाठी स्वतंत्र असे दोन मंत्री आहेत. मग मूळ जलसिंचन खात्याचे ध्येय-धोरण, दिशा व आस्थापना सांभाळणारे मंत्री कोण? शोधा म्हणजे सापडेल! असे प्रश्न राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत विचारले तर किती परिक्षार्थी अचूक उत्तर देऊ शकतील? असो. राजकीय गरजेनुसार मंत्रालयातले प्रशासकीय विभाग स्वतंत्र होत गेले आहेत. सांस्कृतिक कार्य विभागातून मराठी भाषा विभाग स्वतंत्र झाला. आता शालेय स्तरावर मराठी शिकवणारा शालेय शिक्षण विभाग, भाषा संवर्धन म्हणून काळजी घेणारा मराठी भाषा विभाग आणि मराठी संस्कृती व वारसा जपावा म्हणून काम करणारा सांस्कृतिक कार्य विभाग, असे वेगवेगळ्या विभागामार्फत मायमराठीची सेवा सुरू आहे. लोकशाहीत काहीही घडू शकते. आता ३३ चे ४५ विभाग झाल्यावर लोकांना काय फरक पडणार आहे या प्रश्नाचे उत्तर काहीच नाही हेच येते. काही विभागांचे काम व उद्देश बरेचसे समान असल्याने त्याचा एकच प्रशासकीय विभाग अशी रचना तयार करण्यात आली होती. महसूल व वन यांचा संबंध जमिनीशी येतो. महसूल विभागाची यंत्रणा म्हणजेच तलाठ्यापासून ते जिल्हाधिकाऱ्यापर्यंत हे सर्वजण जमिनीशी संबंधित कामकाज करतात. ही यंत्रणा मोठी असल्याने ते नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्तीत मदतकार्य व पुनर्वसन कामात असतात. आता याचे मंत्री मात्र चार झाले. महसूल (भाजपा), वन (भाजपा), आपत्ती व्यवस्थापन (भाजपा) व मदतकार्य आणि पुनर्वसन (राष्ट्रवादी काँग्रेस) असे हे मंत्री. वन विभाग सोडला तर इतर तीन विभागांची आस्थापना म्हणजे अधिकारी नियुक्ती, बढती, बदली हे काम मात्र महसूलमंत्र्यांकडे आहे. सहकार विभागाचे अधिकारी सहकारी संस्थांसोबतच पणन विभागाअंतर्गत येणाऱ्या बाजार समित्या, पणन महामंडळ, शेतमाल विक्री व व्यवस्थापन यात आहेत. पण मंत्री मात्र दोन - सहकार (राष्ट्रवादी) आणि पणन (भाजप). अधिकारी नियुक्ती, बढती, बदली कोण पाहणार तर सहकारमंत्री. प्रशासकीय सोयीसाठी उद्योग, ऊर्जा, कामगार व खनीकर्म एकच विभाग आहे. मंत्री मात्र चार आहेत. मंत्रालयातल्या या विभागातील आस्थापनेचे विषय उद्योग विभागाचे सचिव पाहतात. तीच गत गृह, परिवहन व राज्य उत्पादन शुल्क या विभागाची. इथे मंत्री तीन पण मंत्रालयातली आस्थापना म्हणजेच सहसचिव, उपसचिव, अवर सचिव, कक्ष अधिकारी हे विषय अतिरिक्त मुख्य सचिव (गृह) हे पाहणार. मूळ मुद्दा असा की जितके मंत्री तितके स्वतंत्र विभाग तयार झाले पाहिजेत म्हणजेच त्यांना आपापल्या कक्षेतले अधिकारी कोण हे ठरविता येते. आपल्या प्रशासकीय रचनेत नियुक्ती, बदली, बढती हे अधिकार ज्याच्याकडे तो खरा बॉस असतो. म्हणजे अन्न व नागरी पुरवठा विभागात महसूल विभागाचे उपजिल्हाधिकारी हे जिल्हा पुरवठा अधिकारी व शिधावाटप नियंत्रक कार्यालयात काम करतात. अन्न व नागरी पुरवठा मंत्र्यांची मर्जी खप्पा झाली म्हणून तो अधिकारी तिथून लगेच जात नाही किंवा नवा येत नाही. ते अधिकार महसूलमंत्र्याकडे. याचाच फायदा अधिकाऱ्यांमध्ये आकर्षण असलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण (एसआरए) इथे झाला. इथले अधिकारी महसूल व मुंबई महापालिकेतून घेतले जातात. एसआरए येते गृहनिर्माण विभागांतर्गत, अध्यक्ष असतात मुख्यमंत्री व अधिकारी असतात महसूल व नगरविकासचे. मागे एका महसूलमंत्र्यांनी आमचे अमुक-तमूक अतिरिक्त जिल्हाधिकारी व उपजिल्हाधिकारी खूप वर्ष तिथे आहेत म्हणून त्यांच्या बदल्या केल्या. पण तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी मी एसआरएचा अध्यक्ष असे सांगत त्यांना कार्यमुक्तच केले नव्हते. या धुसफुशी बाहेर येत नाहीत पण त्या प्रचंड 'उलाढाली'च्या असतात. आता मंत्रालयातले विभाग ४५ झाले म्हणून बाहेर फार मोठी क्रांती होईल असे नाही. पण मंत्र्यांना वाटत असते की प्रादेशिक व जिल्हास्तरावर आपली हक्काची स्वतंत्र रचना असावी. ती होण्यासाठी काही काळ लागेल. पण मंत्रालयात आपला विभाग स्वतंत्र झाला तर ती सुरुवात ठरेल. तसेच आपल्याला हवा तो सहसचिव, उपसचिव, अवर सचिव व कक्ष अधिकारी नियुक्त करता यावा, ही खरी इच्छा आहे. युती सरकार असताना १९९५-९९ दरम्यान एका मंत्र्याचे पीए त्या खात्याच्या अतिरिक्त मुख्य सचिवांकडे गेले. त्याकाळी पीए एवढ्या वरिष्ठ अधिकाऱ्याकडे जाणे हा दुर्मिळ प्रसंग असे. आमच्या मंत्री महोदयांना अमुक एक कक्ष अधिकारी बदलून पाहिजे, असे पीए त्या वरिष्ठांना म्हणाले. तो काळच वेगळा होता. वरिष्ठ चमकले व म्हणाले, अडचण काय आहे ते सांगा. माज्या थेट नियंत्रणाखालील विभागात कोण कक्ष अधिकारी असावा हा माझा अधिकार आहे, तुमच्या मंत्र्यांचा नाही. तो पीए अधिक बोलू लागला तेव्हा त्या वरिष्ठांनी विचारले की तू मूळ कोणत्या विभागाचा आहेस. या प्रश्नाचा रोख कळालेल्या व पुढे काय होईल याची कल्पना आलेल्या त्या पीएने तिथून काढता पाय घेतला हे सांगणे नको. पण काळ बदलला. सत्ता नेमकी कोणासाठी आणि कशासाठी वापरायची असते हे नक्की ठरले तर नवे कायदे, नियम करण्याचीसुद्धा गरज भासणार नाही. पण कालाय तस्मै नमः हेच खरे.

आरोग्यसेवेची गळचेपी



वैद्यकीय आस्थापना कायद्याचा उद्देश आरोग्य संस्थांची नोंदणी, दर्जात्मक निकषांची अंमलबजावणी आणि रुग्ण सुरक्षिततेची सुनिश्चिता हा होता. परंतु, अंमलबजावणीत आरोग्यसेवेचीच गळचेपी सुरू आहे.

आरोग्यसेवा म्हणजे केवळ उद्योग नाही. ती समाजाची सेवारूपी जीवनरेखा आहे. डॉक्टर, परिचारिका, आरोग्य कर्मचारी आणि रुग्ण यांच्यातील विश्वासावर उभी असलेली व्यवस्था आहे. परंतु गेल्या काही वर्षांत आरोग्यसेवेकडे पाहण्याचा शासनाचा आणि प्रशासकीय यंत्रणेचा दृष्टिकोन झपाट्याने बदलतो आहे. 'हेल्थकेअर इंडस्ट्री' हा शब्दप्रयोग आता केवळ भाषेपुरता मर्यादित राहिलेला नसून, धोरण, विमा व्यवस्था आणि नियमनाच्या पद्धतींमध्येही तो स्पष्टपणे दिसतो आहे. याच्या केंद्रस्थानी आहे वैद्यकीय आस्थापना कायदा.

वैद्यकीय आस्थापना (नोंदणी व नियमन) विधेयक २०१०चा उद्देश आरोग्यसेवा संस्थांची नोंदणी, किमान दर्जात्मक निकषांची अंमलबजावणी आणि रुग्ण सुरक्षिततेची सुनिश्चिता हा होता. परंतु येथे प्रश्न उद्दिष्टांचा नाही, त्यांच्या अंमलबजावणीच्या पद्धतीचा आहे. आज या कायद्याकडे पाहिल्यास सेवा सुधारण्यापेक्षा नियंत्रण, तपासण्या, परवानग्या, प्रशासकीय हस्तक्षेप आणि आर्थिक अंकुश यांवरच अधिक भर दिला जात आहे. आरोग्यसेवा क्षेत्रावर आधुनिक 'इन्स्पेक्टर राज' लादले जात आहे, अशी भावना वाढत आहे.

भारतातील आरोग्यव्यवस्था मोठ्या कॉर्पोरेट रुग्णालयांवर नव्हे, तर छोटे दवाखाने, कौटुंबिक डॉक्टर, ग्रामीण रुग्णालये आणि मध्यम स्वरूपातील रुग्णालये यांच्यावर उभी आहे. देशातील बहुतांश बाह्यरुग्ण सेवा आणि प्राथमिक आरोग्यसेवा याच क्षेत्रातून पुरवली जाते. मात्र वैद्यकीय आस्थापना कायद्याच्या चौकटीत कॉर्पोरेट हॉस्पिटल आणि ग्रामीण भागातील छोटा दवाखाना यांना एकाच मापदंडात बसवण्याचा प्रयत्न होत आहे, ही मोठी विसंगती आहे. एक बहुमजली सुपरस्पेशालिटी रुग्णालय व दहा खाटांचे ग्रामीण रुग्णालय यांची आर्थिक, भौतिक आणि मनुष्यबळाची क्षमता समान असू शकत नाही. तरीही नियम, तपासण्या, परवानग्या, कागदपत्रांबाबत दोघांकडून समान अपेक्षा ठेवल्या जातात. परिणामी, लहान आणि मध्यम रुग्णालयांसाठी ही व्यवस्था अस्तित्वाचा प्रश्न बनत चालली आहे.

आज रुग्णालय परवाना प्रक्रियेत अग्निशमन विभाग, बायोमेडिकल वेस्ट व्यवस्थापन, विद्युत विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था आणि इतर अनेक प्रशासकीय यंत्रणांचा वाढता हस्तक्षेप दिसतो. त्यामुळे डॉक्टरांना उपचारांपेक्षा कागदपत्रांमध्ये अधिक वेळ घालवावा लागत आहे. सर्वांत गंभीर बाब म्हणजे एका शहरातील नियम दुसऱ्या शहरात वेगळे असतात. अधिकाऱ्यांच्या सोयीप्रमाणे नियमांचा अर्थ बदलतो. परिणामी, पारदर्शकतेपेक्षा भ्रष्टाचार आणि मनमानीला खतपाणी मिळते.

अग्निशमन सुरक्षेचे आणि जैव वैद्यकीय कचऱ्याचे उदाहरण घ्या. अग्निशमन सुरक्षा आवश्यकच आहे; परंतु त्यासाठी विशिष्ट एजन्सीकडूनच उपकरणे घेण्याची सक्ती, वारंवार ऑडिटची बंधने आणि स्थानिक पातळीवरील मनमानी यांमुळे रुग्णालयांवर मोठा आर्थिक भार पडतो. हजारांची उपकरणे लाखांमध्ये विकली जातात. हा सुरक्षेचा प्रश्न आहे की व्यवस्थात्मक पिळवणुकीचा?

वैद्यकीय आस्थापना कायद्याचा दुसरा अत्यंत गंभीर परिणाम आरोग्य विमाक्षेत्राशी जोडलेला आहे. आज आरोग्य विमा क्षेत्र आणि सरकारी विमा योजना या आरोग्यसेवेच्या केंद्रस्थानी आल्या आहेत. महाराष्ट्रातील महात्मा जोतिबा फुले जनआरोग्य योजना असो किंवा खासगी विमा कंपन्या - मूळ उद्देश लोकांच्या खिशावरील उपचारांचा आर्थिक भार कमी करणे हाच आहे. परंतु वास्तवात, विमा असूनही रुग्णांना स्वतःच्या खिशातून मोठ्या प्रमाणात खर्च करावा लागत असेल, तर व्यवस्था कुठेतरी अपयशी ठरत आहे, हे स्पष्ट आहे. करोना साथीने हे वास्तव उघड केले. त्याने सरकारी विमा योजना आणि खासगी विमा क्षेत्रातील मयार्दा स्पष्टपणे समोर आल्या; पण या अपयशाचे खापर सरसकट रुग्णालयांवर फोडले गेले.

रोग्य विमा क्षेत्र हे रुग्णकेंद्रित असणे आवश्यक आहे. परंतु त्याचबरोबर रुग्णालये आणि डॉक्टर यांचाही न्याय्य विचार होणे तितकेच आवश्यक आहे. दुर्दैवाने, आज आरोग्य विमा क्षेत्रातील निर्णय प्रक्रियेत वैद्यकीय तज्ज्ञांचा सहभाग अत्यंत मर्यादित आहे. वैद्यकीय उपचार, रुग्णसेवा आणि रुग्णालय व्यवस्थापन यांचा प्रत्यक्ष अनुभव नसलेले धोरणे ठरवतात, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. सरकारी विमा योजनांमधील दरपत्रके हे त्याचे मोठे उदाहरण. हे दर ठरवताना वैज्ञानिक खर्च विश्लेषण, स्थानिक परिस्थिती, मनुष्यबळ, उपकरणे, महागाई किंवा उपचारांवरील प्रत्यक्ष खर्च यांचा वास्तववादी अभ्यास करण्यात आलेला नाही. 'आम्ही म्हणतो तेच अंतिम' या पद्धतीने अशास्त्रीय आणि न परवडणारे दर रुग्णालयांवर लादले गेले आहेत.

कोरोना काळात ही विसंगती अधिक ठळकपणे समोर आली. पीपीई किट्स, मास्क, ऑक्सिजन, अतिरिक्त मनुष्यबळ, व्हेंटिलेटर्स आदी उपचार साधनांचा खर्च अनेक पटींनी वाढला होता. मात्र विमा दरपत्रके ठरवताना या वाढीव खर्चाचा विचारच झाला नाही. राज्यातील विविध स्थानिक स्वराज्य संस्थांनी वेगवेगळे दर लागू केले; परंतु करोना उपचारांचा खर्च सर्वत्र समान असताना या वेगवेगळ्या दरांना कोणताही शास्त्रीय आधार नव्हता. करोनाच्या पहिल्या आणि दुसऱ्या लाटेत ८० टक्क्यांहून अधिक रुग्णांची सेवा लहान आणि मध्यम स्वरूपातील रुग्णालयांनी केली. जोखीम त्यांनी उचलली, कर्मचारी टिकवले आणि सेवा सुरू ठेवली; पण निर्णय प्रक्रियेत त्यांच्या म्हणण्याला स्थान नव्हते. उलट त्यांच्यावरच अशास्त्रीय दर आणि प्रशासकीय दडपण लादले गेले.

आज आरोग्यव्यवस्था मोठ्या प्रमाणावर खासगी क्षेत्रातील डॉक्टर आणि रुग्णालयांवर उभी आहे. अशा परिस्थितीत खासगी रुग्णालयांकडे सतत संशयाने पाहणे, त्यांना नियंत्रित करावयाचा प्रयत्न आणि विमा कंपन्यांच्या नफेखोरीसाठी त्यांची गळचेपी करणे हा अन्याय आहे.

सेवादायी लहान रुग्णालये आणि नफेखोरीच्या कॉर्पोरेट मॉडेलवर चालणारी रुग्णालये यांना एकाच तराजूत तोलणे धोकादायक आहे. इंडियन मेडिकल असोसिएशनने नेहमीच वाढीव आणि अवास्तव शुल्कआकारणीस विरोध केला आहे. परंतु काही कॉर्पोरेट मॉडेल्समधील विकृतींचे कारण पुढे करून सर्वच लहान-मध्यम रुग्णालयांवर अन्यायकारक बंधने लादली जात आहेत.

खरा प्रश्न असा आहे, की विमा असूनही लोकांना खिशातून मोठ्या प्रमाणात पैसे का भरावे लागतात? कॅशलेस सुविधा उपलब्ध असतानाही विमा कंपन्या रुग्णांच्या बिलांना कात्री का लावतात? रुग्णालयांच्या वैज्ञानिक खर्चाचा विचार का केला जात नाही? आणि विमा क्षेत्रातील नफेखोरीचे ओझे रुग्णालयांवर का टाकले जाते? आरोग्यसेवा ही संशयाच्या नजरेतून पाहण्याची व्यवस्था नाही. डॉक्टर आणि रुग्णालयांकडे भागीदार म्हणून पाहिले गेले पाहिजे. धोरणनिर्मितीत वैद्यकीय तज्ज्ञांचा सन्मानपूर्वक सहभाग आवश्यक आहे. आरोग्यसेवा, आरोग्य विमा आणि रुग्णालय व्यवस्थापन हे केवळ प्रशासकीय किंवा राजकीय विषय नसून अत्यंत तांत्रिक आणि तज्ज्ञतेवर आधारित क्षेत्र आहे. अन्यथा परिणाम स्पष्ट आहेत. छोटे दवाखाने बंद पडतील, कौटुंबिक वैद्यकीय सेवा कमी होईल आणि आरोग्यसेवा काही मोजक्या कॉर्पोरेट संस्थांच्या हातात केंद्रित होईल. त्याची किंमत शेवटी रुग्णालाच मोजावी लागेल.

रुग्णालय हा कारखाना नाही. रुग्ण हा ग्राहक नाही. डॉक्टर हा व्यापारी नाही, आणि आरोग्यसेवा ही उद्योग नाही; ती समाजाची जीवनरेखा आहे. आरोग्यसेवेच्या केंद्रस्थानी बाजार नव्हे, तर माणूस असला पाहिजे.

अवघे जग फुटबॉलमय!

तीन यजमान देश, ४८ संघ, १०४ सामने, १६ स्टेडियम आणि चार टाइमझोन अशी भव्यता असलेल्या वर्ल्ड कप फुटबॉलचा जल्लोष उत्तर अमेरिकेत सुरू झाला आहे. १९ जुलैपर्यंत सर्व जग फुटबॉलमय असेल. ही स्पर्धा आत्तापर्यंतची सर्वांत भव्य आहे, पण सर्वोत्तम होईल का, याचे उत्तर १,२४८ खेळाडू प्रतिकूल परिस्थितीत कशी कामगिरी करतात, यावर अवलंबून असेल. ह्युस्टन येथील वाढत्या उष्णतेपासून ते समुद्रसपाटीपासून खूपच उंचीवर असलेल्या गुआलाजारा येथपर्यंत खेळण्याचे आव्हान असेल. यंदा ही स्पर्धा ह्याफिफाह्नला शांतिदूत पुरस्कार देण्यास भाग पाडणारे अमेरिकी अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या धोरणानुसार आणि इराण विरुद्ध इस्त्रायल-अमेरिका यांच्यातील युद्धाच्या छायेत होत आहे. वर्ल्ड कपसाठी सहयजमान असलेला कॅनडा हा अमेरिकेचा भाग कसा होईल, याचे वेध ट्रम्प यांना लागले आहेत. अमेरिकाविरोधकांना देशाबाहेर ठेवण्यासाठी जाचक नियम आणले जात आहेत. त्यामुळे या स्पर्धेच्यावेळी मनापासून स्वागत होत असल्याचे चित्र नाही. चढ्या तिकीटदरांमुळे ही स्पर्धा सर्वांसाठी आहे का, हाही प्रश्न पडतो. हे सर्व सुरू आहे, ते स्पर्धा होत असलेल्या अमेरिका, कॅनडा आणि मेक्सिकोमध्ये. उत्तर अमेरिकेबाहेरून स्पर्धेचा आस्वाद घेणाऱ्यांना मैदानावरील खेळ, नंतरचा जल्लोष आणि टोकाची निराशा हा अनुभव लाभेल. आजपासून चमकदार खेळ, धक्कादायक निकाल, चेंडूवरील कमालीचे कौशल्य, थिरकणारी पावले, एकमेकांवर आरूढ होत गोल करण्याचे केलेले प्रयत्न दिसतील. इंग्लंडला सहा दशकांपासून, ब्राझीलला जवळपास दोन दशके, जर्मनीला गेली काही वर्षे विजेतेपद हुलकावणी देत आहे. त्याचबरोबर स्पेन, फ्रान्स, अर्जेंटिना यांच्यातही विजेतेपद पुन्हा हस्तगत करण्याची चुरस असेल. कमालीची व्यावसायिकता तसेच पैशाचा धबधबा खेळावर वर्चस्व मिळवत आहे, असे वाटत असतानाच जेमतेम दीड लाख लोकसंख्येचा देश असलेला कुराकाओ तब्बल चार वेळा वर्ल्ड कप विजेते झालेल्या जर्मनीला आव्हान देण्यासाठी मैदानात उतरेल, त्या वेळी ट्रम्प यांच्या धोरणाचा, त्यांच्या इन्फँटिनोवरील नियंत्रणाचा विसर पडेल अन् सर्वत्र फुटबॉलचाच बोलबाला असेल. हेच या स्पधेर्चे यश आहे.

तप विश्वास, विकास आणि जनसहभागाचे!



तब्बल १२ वर्षे म्हटले की आपण सवयीने एक तप असे म्हणतो. तप या शब्दातच तावून-सुलाखून निघण्याचा संघर्ष आहे, ध्येयपूर्तीसाठी सातत्यपूर्ण प्रयत्न आणि लक्ष्यप्राप्तीसाठीचा संकल्प. पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या नेतृत्वाचे एक तप पूर्ण झाले, असे म्हणतो तेव्हा तिन्ही कसोटीवर परीक्षण केले जाणे आवश्यक आहे.

तपश्चर्येला दोन बाजू असतात. ही तपश्चर्या समाजासाठी असली तर त्याचे फळ समाजालाच मिळते, समाजातील अनेक घटकांना त्याचा लाभ होतो. मोदीजींच्या या तपश्चर्येचे फळ म्हणजे भारतातील सर्वसामान्य माणसाच्या जीवनात आलेली अभूतपूर्व क्रांती आहे. मोदीजींची २०१४ ते २०२६ ही १२ वर्षांची वाटचाल अशाच एका परिवर्तनकारी युगाची साक्ष देणारी आहे. ही केवळ सत्तेची बारा वर्षे नसून विश्वास, विकास, सुशासन, सांस्कृतिक पुनर्जागरण आणि जनकल्याण यांचा अभूतपूर्व संगम आहे.

आज आणखी एक विशेष बाब आहे, निर्वाचित पंतप्रधान म्हणून सलग ४३९९ दिवस मोदीजींनी पूर्ण केले. असे करताना त्यांनी पं. नेहरू यांचा विक्रम मोडला. नेहरूजी आणि मोदीजी यांची तुलनाच होऊ शकत नाही अशी वल्गना काही लोक करतील. नेहरूजी ज्या काळात प्रधानमंत्री झाले तेव्हा नेहरूजींना पर्याय नाही अशीच काहीशी भारतीय समाजाची मानसिकता होती, पण मोदीजी जेव्हा प्रधानमंत्री झाले तेव्हा लोक संवैधानिकदृष्ट्या प्रगल्भ झाले होते. त्यांना मतदानाचा अधिकार, त्याचे महत्त्व समजले होते. आपल्या आशा, आकांक्षा काय आहेत, याची जाणीव स्पष्ट झाली होती. सरकार लोककल्याणासाठीच आहे, हे त्यांना माहिती होते. अशा काळात मोदीजी यांचे सरकार आले होते, त्यामुळे जे काँग्रेसला ५०-६० वर्षांत जमले नाही ते करून दाखवण्याचे आव्हानच जनतेने त्यांच्या नेतृत्वाला भरभरून मते देऊन २०१४ मध्ये दिले आणि त्या आव्हानाला शिरोधार्य मानत मोदीजींचा 'सब का साथ-सब का विकास' हा प्रवास सुरू झाला. मग 'सब का विश्वास-सब का प्रयास' असे वेळोवेळी जोडले गेले. २०१४, २०१९ आणि २०२४ असे यशाचे टप्पे पार करीत ते आज भारताला वैश्विक नेतृत्व प्रदान करीत आहेत.

२०१४ आणि २०१९ मधील सुस्पष्ट जनादेशानंतर २०२४ मधील विजय हे केवळ निवडणुकीतील यश नव्हते, तर जनतेने विकास, सुशासन आणि स्थिर नेतृत्वावर व्यक्त केलेला पुनर्विश्वास होता. १९६२ नंतर सलग तिसऱ्यांदा पंतप्रधानपद मिळवणारे नरेंद्र मोदी हे देशातील पहिले नेते ठरले. जगातील अनेक लोकशाही व्यवस्था राजकीय अस्थिरतेशी झुंज देत असताना भारताने स्थैर्य, सातत्य आणि निर्णायक नेतृत्वाचा मार्ग निवडला. गेल्या दशकात मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताने राजकीय स्थैर्याला विकासाची जोड दिली. आर्थिक सुधारणा, सामाजिक परिवर्तन, पायाभूत सुविधा विकास, राष्ट्रीय सुरक्षा आणि प्रभावी परराष्ट्र धोरण यामुळे भारत आज जागतिक स्तरावर अधिक सक्षम, आत्मविश्वासपूर्ण आणि प्रभावी राष्ट्र म्हणून उदयास आला आहे. २४ हून अधिक राष्ट्रांनी त्यांना दिलेले सर्वोच्च सन्मान ही त्याची पावती आहे.

हा फक्त एक नेतृत्वाचा प्रवास नव्हता, यामध्ये भारतीय जनता सहभागीदार होती हेच या प्रवासाचे वैशिष्ट्य आहे आणि फलित म्हणाल तर भारताची अर्थव्यवस्था दोन ट्रिलियन डॉलरवरून ४.१८ ट्रिलियन डॉलर! जगातील चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था. जगातील सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था. सामाजिक न्यायाची स्थापना करायची असेल तर आधी आपली आर्थिक बाजू समृद्ध असली पाहिजे, ही मोदीजींनी फक्त जाणले नाही तर त्यासाठी त्यांनी सर्व स्तरावर प्रयत्न केले. मेक इन इंडिया असो किंवा आत्मनिर्भर भारत असो, यांनी भारतीयांना आत्मविश्वास तर दिला पण भारतीय वस्तूंबद्दल जगामध्ये विश्वास जागवला. आज स्वदेशी शस्त्रास्त्रांची मागणी इतकी वाढली आहे की, पुढील दहा वर्षांचे उत्पादनही अपुरे पडेल. हीच आत्मनिर्भर भारताची खरी ताकद आहे.

देशातील १२ राज्यांमधून नक्षलवादाचा प्रभाव कमी करणे ही मोदी सरकारची ऐतिहासिक उपलब्धी आहे. अनेक दशकांपासून विकासापासून वंचित असलेल्या भागात आता विकासाची गंगा पोहोचत आहे. देशभरात २० कोटी लोक भीती आणि गरिबीच्या सावटाखाली जगत होते. नक्षलवादामुळे विकास पोहोचत नव्हता. हजारो युवकांचे जीवन उद्ध्वस्त झाले. पण आज परिस्थिती बदलत आहे. गडचिरोलीसारख्या भागात स्टील उद्योग उभे राहत आहेत. विद्यापीठे, मेडिकल कॉलेज, मोठ्या शैक्षणिक संस्था सुरू होत आहेत. कारण बंदुकीच्या आवाजावर विकासाच्या आवाजाने विजय मिळवला आहे.

गेल्या १२ वर्षांत भारताने पायाभूत सुविधांच्या विकासात अभूतपूर्व झेप घेतली आहे. राष्ट्रीय महामार्गांचे जाळे ९१ हजार किलोमीटरवरून सुमारे १.४६ लाख किलोमीटरपर्यंत विस्तारले. दररोज सरासरी ३४ किलोमीटर महामार्ग बांधले जात आहेत. ग्रामीण भारताच्या विकासासाठी प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत लाखो किलोमीटर रस्त्यांची उभारणी करण्यात आली. या रस्त्यांमुळे शेतकरी, विद्यार्थी आणि ग्रामीण नागरिकांच्या जीवनात आमूलाग्र बदल झाला आहे. रेल्वे क्षेत्रात ब्रॉडगेज विद्युतीकरण गतीने होत असून वंदे भारत एक्स्प्रेस, अमृत भारत स्टेशन योजना आणि आधुनिक रेल्वे स्थानकांमुळे भारतीय रेल्वेची ओळख बदलली आहे. मेट्रो नेटवर्क २४८ किलोमीटरवरून १,०९५ किलोमीटरपेक्षा अधिक वाढले आहे.

मोदी सरकारने 'अन्नदाता' शेतकऱ्याला विकासाच्या केंद्रस्थानी ठेवले. प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेद्वारे ११ कोटींहून अधिक शेतकऱ्यांना थेट आर्थिक सहाय्य देण्यात आले. सरकार स्थापन झाल्यानंतर तिसऱ्या कार्यकाळातील पहिली फाइलही शेतकरी कल्याणाशी संबंधित असल्याने सरकारची प्राथमिकता स्पष्ट झाली. प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेंतर्गत 'पर ड्रॉप मोअर क्रॉप' अभियानामुळे लाखो हेक्टर क्षेत्र सूक्ष्म सिंचनाखाली आले. कृषी उत्पादनात विक्रमी वाढ झाली असून भारत आज जगातील सर्वात मोठा दूध उत्पादक देश बनला आहे.

प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेद्वारे ८१ कोटी नागरिकांना मोफत धान्य पुरवण्यात आले. प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत ४ कोटींहून अधिक कुटुंबांना पक्की घरे मिळाली. उज्ज्वला योजनेमुळे ११ कोटी महिलांना मोफत गॅस जोडणी मिळाली. आयुष्मान भारत योजनेमुळे कोट्यवधी नागरिकांना मोफत आरोग्य संरक्षण मिळाले. जलजीवन मिशनमुळे १६ कोटींपेक्षा अधिक घरांपर्यंत नळाद्वारे स्वच्छ पाणी पोहोचले.

मोदी सरकारच्या धोरणांमध्ये महिलांना विशेष स्थान देण्यात आले. जनधन खात्यांमध्ये महिलांचा मोठा सहभाग आहे. 'लखपती दीदी' अभियानामुळे लाखो महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम झाल्या. सुकन्या समृद्धी योजना, मातृत्व लाभ, स्वयं-सहाय्यता गटांचे सक्षमीकरण आणि सशस्त्र दलांमध्ये महिलांच्या वाढत्या सहभागामुळे महिलांच्या नेतृत्वाखालील विकासाची संकल्पना प्रत्यक्षात उतरली आहे.

मोदी सरकारच्या कार्यकाळात भारताने डिजिटल क्रांतीचा नवा इतिहास घडवला. जनधन, आधार आणि मोबाईल या माध्यमातून लाखो कोटी रुपये थेट लाभार्थ्यांच्या खात्यात पोहोचले. यूपीआय व्यवहारांमध्ये भारताने जागतिक नेतृत्व मिळवले आहे. भारतनेट प्रकल्पाद्वारे लाखो ग्रामपंचायतींना ऑप्टिकल फायबर नेटवर्कशी जोडण्यात आले आहे. डिजिटल गव्हर्नन्स, फेसलेस कर प्रणाली आणि जेम पोर्टलमुळे प्रशासन अधिक पारदर्शक आणि कार्यक्षम झाले आहे.

भारत आता जगाशी समानतेच्या नात्याने संवाद साधत आहे. भारताला व्यापार हवा आहे, गुंतवणूक हवी आहे, तंत्रज्ञान हवे आहे, पण आत्मसन्मान आणि स्वाभिमानाच्या आधारावर! रशिया-युक्रेन युद्धाच्या काळातही भारताने स्वतःचे राष्ट्रीय हित सर्वोच्च ठेवले. जगाच्या दबावाखाली न झुकता स्वतंत्र भूमिका घेण्याचे सामर्थ्य आज भारताने दाखवून दिले आहे.

आज भारत जगातील चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनला आहे. 'मेक इन इंडिया', 'स्टार्टअप इंडिया' आणि 'पीएलआय' योजनांमुळे उत्पादन क्षेत्राला नवी गती मिळाली आहे. भारत जगातील दुसरा सर्वात मोठा मोबाईल उत्पादक देश बनला आहे. इलेक्ट्रॉनिक्स उत्पादनात अनेकपटीने वाढ झाली आहे. सेमीकंडक्टर उत्पादनासाठी मोठ्या गुंतवणुकी आकर्षित झाल्या असून भारत जागतिक उत्पादन केंद्र बनण्याच्या दिशेने वेगाने वाटचाल करीत आहे. स्टार्टअप संस्कृतीला मिळालेल्या प्रोत्साहनामुळे देशात दोन लाखांहून अधिक स्टार्टअप्स आणि शेकडो युनिकॉर्न निर्माण झाले आहेत.

मोदी सरकारच्या १२ वर्षांत भारताने आपल्या सांस्कृतिक अस्मितेचा अभिमानाने पुनर्शोध घेतला आहे. अयोध्येतील प्रभू श्रीराम मंदिर, काशी विश्वनाथ कॉरिडॉर, महाकाल लोक, केदारनाथ पुनर्विकास यासारख्या प्रकल्पांनी देशाच्या आध्यात्मिक चेतनेला नव

अंघोळ केल्यानंतर मिळणारा फ्रेशनेस कशातच नाही. दिवसातून किमान एकदा तरी आपण अंघोळ करतो. अंघोळ केल्यानंतर अंग पुसण्यासाठी आपण टॉवेलचा उपयोग करतो. तुम्ही वापरत असलेला टॉवेल तुमचे शरीर पुसण्याचे काम करतो, पण याशिवाय तुमच्या शरीरावरील मळ काढण्यासही मदत करतो. पण जर तुम्ही तुमच्या टॉवेलची योग्य काळजी घेतली नाही तर मात्र हाच टॉवेल तुमच्या त्वचेचा शत्रू बनू शकतो. आज आम्ही तुम्हाला याबद्दल अधिक माहिती देणार आहोत. त्यामुळे तुम्हीही टॉवेल कसाही वापरत असाल तर हे नक्की वाचा.

...तर तुमचा टॉवेल बनू शकतो तुमच्या त्वचेचा शत्रू

टॉवेलची स्वच्छता

काही जणांना टॉवेल सतत धुण्याची गरज नसते, असे वाटते. तुम्ही असा विचार करत असाल तर तो अगदीच चुकीचा आहे. कारण तुम्ही अंघोळ केल्यानंतर तुमच्या शरीरावर साचलेला मळ काढला जातो. त्यामुळे साहजिकच तुमचा मळ टॉवेलवर साचतो. अशावेळी जर तुम्ही हा टॉवेल सतत वापरत राहिलात तर तुमच्या त्वचेवरही मळ साचत राहील. त्यामुळे तुम्हाला स्वच्छ करणाऱ्या टॉवेलची स्वच्छताही तितकीच महत्त्वाची आहे. आठवड्यातून किमान दोन वेळा तरी तुमचा टॉवेल धुणे अपेक्षित असते. जर तुमचा टॉवेल पातळ असेल तर तुम्ही तो रोज धुतला तर फारच उत्तम.

आता आली फेकून देण्याची वेळ

टॉवेल कितीही चांगला वाटत असला तरी त्याला वापरण्याचीही काहीतरी मर्यादा आहे. तुम्ही वर्षानुवर्षे एकच टॉवेल वापरू शकत नाही. तुम्हाला कालांतराने टॉवेल फेकण्याचीही गरज असते. तुम्ही कॉटन किंवा टर्किश कोणताही टॉवेल वापरत असाल तरीदेखील तुम्ही हा टॉवेल सहा महिन्यांनी काढून टाकायला हवा. जास्तीत जास्त सहा महिने आणि कमीत कमी ३ महिने तुम्ही टॉवेल वापरायला हवा.

टर्किश की कॉटन टॉवेल

तुमची त्वचा ही फारच नाजूक असते. कोणतेही कॉस्मेटिक वापरताना तुम्ही अगदी पारखून सगळ्या गोष्टी तपासता. पण मग टॉवेलबाबतीत का नाही? तुम्हाला लवकर वाळणारा टॉवेल हवा असेल तर तुम्ही पंचा किंवा पातळ टॉवेलची निवड करा. जर तुम्हाला मऊ असा टॉवेल हवा असेल तर तुम्ही टर्किश टॉवेलचा वापर करा. आता तुमच्या आवडीवर टॉवेलची निवड अवलंबून आहे.



सूर्यप्रकाश महत्त्वाचा

अनेकांना टॉवेल वाळत घालण्याचा कंटाळा असतो. पण तुमच्या टॉवेलसाठी सूर्यप्रकाश महत्त्वाचा असतो. त्यामुळे तुम्ही तुमचा टॉवेल सूर्यप्रकाशात वाळत घालायला हवा. कारण जर त्या टॉवेलवर काही जंतू असतील आणि तुम्हाला टॉवेल धुणे शक्य नसेल अशावेळी कडकडीत उन्हात टॉवेल ठेवल्यामुळे त्यावरील जीवाणू कमी होतात.



एकट्याने वापरण्याची गरज

शेअरिंग-केअरिंगमध्ये तुम्ही एकाच टॉवेलचा दोन ते तीन जण वापर करत असाल तर ते तुमच्या त्वचेसाठी फारच वाईट आहे. कारण दोन ते तीन जणांनी एकच टॉवेल वापरला तर तुम्हाला संसर्ग होण्याची शक्यता अधिक असते. त्यामुळे तुम्ही कधीही एकच टॉवेल दोन ते तीन जणांमध्ये वापरू नका. तुम्हाला त्वचा विकार जडण्याची शक्यता यामध्ये अधिक असते. आता तुम्हाला टॉवेल हा अंघोळीपुरता वाटत असला तरी त्याचे महत्त्व काय ते नक्कीच कळलं असेल, त्यामुळे यापुढे याची अधिक खबरदारी घ्या.

त्वचेच्या संसर्गापासून मुक्ती मिळवण्यासाठी घरगुती उटणे



साहित्य :

एक वाटी मसूर डाळीचे पीठ, कच्चे तांदूळ एक चतुर्थांश कप, आठ बदाम, अर्धा कप गव्हाचा सांजा, चिमूटभर हळद, गुलाबपाणी

कृती व वापरण्याची पद्धत

▮ मसूर डाळ, तांदूळ आणि बदाम बारीक वाटून त्याची पूड तयार करा. ▮ या पावडरमध्ये गव्हाची भरड आणि हळद घाला. ▮ या मिश्रणात पाणी किंवा गुलाबपाणी घालून पेस्ट बनवा. ▮ ही पेस्ट चेहरा, मान आणि हातावर लावा. ▮ वाळल्यावर पाण्याने धुऊन घ्या. ▮ आठवड्यातून एकदा या उटण्याचा वापर करावा.

हे कसे कार्य करते?

त्वचेच्या सौंदर्यवर्धनासाठी प्राचीन काळापासून उटण्यांचा वापर केला जात आहे. हे त्वचेवरील घाण दूर करण्यास मदत करतं. हळदीत आढळणाऱ्या अँटिसेप्टिक गुणधर्मामुळे त्वचेचं संसर्गापासून संरक्षण होतं. बदाम त्वचेचं पोषण करून रंग उजळण्यास मदत करतो.

शरीरासाठी अतिशय घातक आहे साबुदाणा

उपवास, व्रत-वैकल्यांसाठी वापरण्याआधी जाणून घ्या गुणधर्म



हिंदू धर्मासह इतरही धर्मांत अनेक सण-उत्सव, व्रत-वैकल्ये केली जातात, उपवास ठेवले जातात. यामध्ये एक समान गोष्ट असते ती म्हणजे उपवासाचे पदार्थ. उपवासादरम्यान जवळजवळ सर्व घरांत हमखास वापरण्यात येणारा पदार्थ म्हणजे साबुदाणा. तसाही साबुदाणा पूर्ण वर्षात विविध कारणांनी वापरला जातो, अनेक ठिकाणी साबुदाणा खिचडी, साबुदाणा वडे हे नाश्त्याचे पदार्थ म्हणून त्याला पसंती दिली जाते. मात्र इतक्या मोठ्या प्रमाणात वापरण्यात येणारा साबुदाणा आपल्या शरीरासाठी लाभदायक आहे का, याचा कधी विचार केला आहे?

साबुदाणा शरीरासाठी आहे अतिशय घातक, तुम्हीच पाहा कारणे -

▮ साबुदाण्याचा जन्म हा इंडोनेशिया, मलेशिया, फिलिपाईन्स या देशांत झाला. साबुदाणा हा सागो झाडांपासून कृत्रिमरीत्या तयार केला जातो. यामध्ये कर्बोदकांचे प्रमाण अतिशय जास्त आहे, त्यामुळे वजन वाढण्यासाठी हा कारणीभूत ठरू शकतो.

▮ १०० ग्रॅम साबुदाण्यामध्ये मध्ये ९४ ग्रॅम कर्बोदके, ०.२ ग्रॅम प्रथिने, ०.५ ग्रॅम तंतुमय घटक व फक्त १० ग्रॅम कॅल्शिअम असते. यावरून लक्षात येते की शरीरासाठी (वजन वाढवण्याखेरीज) तसा या पदार्थाचा काहीच उपयोग नाही.

▮ साबुदाण्यापासून पदार्थ बनवण्यासाठी त्यात जे पदार्थ वापरले जातात, त्यामध्ये बटाटा, शेंगदाणे कुट व इतर काही घटकांचा समावेश असतो. हे घटक पचायला अतिशय जड असतात यामुळे पित्त वाढणे, पोट फुगणे, पोट दुखणे, भूक मंदावणे अशा समस्या उद्भवतात.

▮ साबुदाणा आतड्यातील सर्व द्राव शोषून घेत असल्याने आपली मलप्रवृती सुद्धा कठीण होते. तसेच साबुदाण्यामुळे पित्ताचा त्रासही वाढतो.

अशाप्रकारे ज्या दिवशी हलका आणि प्रमाणात आहार घ्यायचा त्याच दिवशी, म्हणजे उपवासाच्या दिवशी आपण साबुदाण्यासारखा जड पदार्थ खाऊन स्वतःच्या शरीराचे नुकसान करून घेत आहोत. त्यामुळे वेळीच सावध व्हा व साबुदाण्याचा जितका हवा तितकाच वापर करा.

आयुर्वेदानुसार मनुकांमध्ये भरपूर मात्रेत औषधी गुण असतात. आम्हाला रोज ४-५ मनुका खायलाच पाहिजे. मनुकांना सर्दी-खोकला आणि कफ दूर करण्याचे सर्वात उत्तम औषध मानले जाते. त्याशिवाय देखील मनुकांचे बरेच फायदे असतात. त्यात उपस्थित न्यूट्रिएंट्स बऱ्याच आजारांमध्ये फायदेशीर ठरतात. तर जाणून घेऊ रोज मनुका खाण्याचे काय फायदे आहेत...

रोज करा ५ मनुकांचे सेवन आणि बघा त्याचे फायदे

▮ मनुका खाल्ल्याने ब्लड सर्क्युलेशन इम्प्रुव्ह होते. यामुळे त्वचेची रंगत वाढते आणि रंग देखील निखरण्यास मदत होते.

▮ मनुकांमध्ये फायबर्स असतात. हे डायजेशन योग्य ठेवण्यास मदत करतात.

▮ यात पोटॅशियमची मात्रा जास्त असते. मनुका हार्ट अॅटॅकच्या आजारांमध्ये इफेक्टिव्ह आहे.

▮ यात आयर्न असतं. हे ॲनिमिया (रक्ताची कमतरता) दूर करण्यास फायदेशीर ठरतात.

▮ यात अँटीऑक्सिडेंट्स असतात. यामुळे कॅन्सरसारख्या गंभीर आजारांपासून बचाव होण्यास मदत मिळते.

▮ यात अँटीबॅक्टेरियल गुण असतात. यामुळे सर्दी-खोकला ठीक होण्यास मदत मिळते.

▮ यात बीटा कॅरोटिन असते, जे डोळ्यांसाठी फायदेशीर ठरतं.

▮ यात ऑक्झेलिक ॲसिड असतं. यामुळे दात मजबूत होतात. यामुळे गम प्रॉब्लेमपासून बचाव होतो.

▮ यात कॅल्शियमची मात्रा अधिक असते. म्हणून जॉइंट पेनपासून बचाव होतो.

▮ याचे सेवन केल्याने बॉडीचे टॉक्सिन्स दूर होऊन हेअर फॉलची समस्या देखील दूर होते.



मनुका खाण्याचे हेल्दी मार्ग

▮ कब्ज दूर करण्यासाठी रात्री पाच मनुका आणि एक लसणाची कळी खायला पाहिजे.

▮ मनुकांत मध मिसळून खाल्ल्याने देखील फायदा होतो.

▮ याला दुधात उकळून त्याचे सेवन केल्याने देखील फायदा होतो.

▮ मनुकांमध्ये बडिशेप आणि ओवा मिसळून खाल्ल्याने देखील फायदा होतो.

जास्त मीठ खाल्ल्याने होऊ शकतो मधुमेह



मधुमेहापासून
स्वतःला दूर ठेवायचे असेल तर केवळ साखर खाणे सोडून चालणार नाही. कारण, नुकत्याच करण्यात आलेल्या एका नव्या संशोधनानुसार जास्त मीठ खाणेही बनू शकते मधुमेहाचे कारण. संशोधकांच्या मते जास्त मीठ म्हणजे सोडियम खाल्ल्याने उच्च रक्तदाबाची समस्या निर्माण होते.

मात्र, आता नव्या संशोधनामुळे जास्त मीठ खाणे हे कारण मधुमेह हा आजार होण्यात महत्त्वाची भूमिका पार पाडते. लिस्बनमध्ये आयोजित युरोप असोसिएशन फॉर द स्टडी ऑफ डायबेटिसच्या वार्षिक बैठकीत यासंबंधी माहिती देण्यात आली.

जे लोक दिवसभरात २.५ ग्रॅमपेक्षाही जास्त मीठ खातात, त्यांना टाइप २ डायबेटिसचा धोका ४३ टक्क्यांहून अधिक असतो. तसेच शरीराच्या आवश्यकतेपेक्षा ७.३ ग्रॅम जास्त मीठ खात असाल, तर टाइप २ डायबेटिसचा धोका वाढून तो ७२ टक्क्यांवर पोहोचतो.

चेहरा आरोग्याचा आरसा

आपली त्वचा हा आपल्या आरोग्याचा आरसा असतो. त्यातल्या त्यात चेहऱ्याची त्वचा आपले आरोग्य कसे आहे हे दर्शवीत असते. जुन्या काळातील आयुर्वेदासारख्या सगळ्या जुन्या उपचार पध्दतींनी ही गोष्ट मान्य केलेली आहे. चीनमध्ये लोकप्रिय असलेल्या ॲक्युपंक्चर किंवा ॲक्युप्रेशर अशा जुन्या उपचार पध्दतीत सुध्दा चेहरा बघून आरोग्याचे निदान केले जाते.

आयुर्वेदामध्ये जशी नाडी परीक्षा आहे. तेवढी ही चेहऱ्याची परीक्षा शास्त्रशुध्द आणि नेमकी नाही. परंतु आरोग्याच्या काही तक्रारींचा अंदाज चेहऱ्याच्या त्वचेवरून येतो असे अनेक अनुभवी डॉक्टर आणि वैद्यांचे म्हणणे आहे. आपल्या शरीरातल्या अवयवांमध्ये जे काही घडते त्याची प्रतिक्रिया चेहऱ्यावर उमटते आणि चेहऱ्यावरून जे दिसते त्याचाच विस्तार शरीरातल्या अवयवांमध्ये झालेला असतो असे चिनी लोक मानतात.

आधुनिक काळातले त्वचारोग तज्ञ देखील त्वचेवरच्या विविध डागांवरून रुग्णाच्या कोणत्या अवयवात काय बदल झालेले आहेत हे हेरता येते असे मान्य करत आहेत. काही डॉक्टरांनी तर चेहऱ्यावरचा कोणता बदल शरीरातल्या कोणत्या दोषाचा द्योतक आहे याचे काही ठोकताळे बसवलेले आहेत. तोंडामध्ये होणारे बदल किंवा दिसणारे दोष हे पोटातल्या विकाराचे द्योतक असतात. अपचन झालेल्या रुग्णाच्या तोंडाला दुर्गंध येतो. पोटातल्या काही विकारांचे प्रतिबिंब तोंड येण्यात उमटत असते. मूत्रपिंड आणि मूत्राशय यात काही दोष असतील तर ते दोष हनुवटीवर उमटतात. त्याच बरोबर लिव्हरमध्ये काही दोष असेल तर पापण्यामध्ये बदल होतात. काही लोकांना या गोष्टी मान्य नाहीत परंतु शेवटी हे ठोकताळे आहेत.





काही लोकांच्या चेहऱ्यावर मानेच्या मागे त्वचा ड्रिकट पडायला लागते तेव्हा काही विशिष्ट आजार बळावत असतात. काही लोकांच्या चेहऱ्यावरच्या काही बदलांतून अनेक डॉक्टरांना तो मधुमेहाला बळी पडण्याची शक्यता लक्षात येते. चेहऱ्यातले काही बदल विशेषतः कानाच्या मागचे बदल हे रुग्ण ज्यादा अन्न प्राशन करत असल्याचे द्योतक असते असे काही डॉक्टरांच्या लक्षात आले आहे.

सतत पैशाच्या मागे लागणारे लोक, दारू पिणारे लोक, रक्तदाब वाढलेले लोक चेहऱ्यावरून सरळ सरळ ओळखू येतात मात्र त्यासाठी अनुभवी नजर लागते.

चवीला गोड, शरीराला पोषक आणि त्वचेचे आरोग्य सुधारणारे फळ म्हणजे पपई ! पपई शरीराला गरम असल्याने वातावरणात गारवा असताना खाणे हितकारी आहे. तसेच पपई खाण्याचे आणखी दहा फायदेदेखील आहेत....

पपई खाण्याचे १० आरोग्यदायी फायदे!

▮ **शरीरातील कोलेस्टेरॉल कमी करते-** पपईमध्ये व्हिटामिन सी व फायबरचे प्रमाण अधिक असल्याने रक्तवाहिन्यांमध्ये कोलेस्टेरॉल साचून राहण्यापासून बचाव होतो. रक्तवाहिन्यांमध्ये कोलेस्टेरॉल साचून राहिल्याने हृद्यविकाराचा धोका संभवतो.

▮ **वजन घटवण्यास मदत होते-** एका मध्यम आकाराच्या पपईमध्ये 120 कॅलेरीज असतात. त्यामुळे जर तुम्ही वजन घटवण्याच्या विचारात असाल तर पपईचा आहारात नियमित समावेश करा. पपईतील डायटरी फायबर्समुळे वेळी-अवेळी लागणाऱ्या भूकेवर नियंत्रण मिळवणे शक्य होते.

▮ **रोगप्रतिकारशक्ती वाढते-** आजारांशी सक्षमतेने सामना करण्यासाठी तुमची रोगप्रतिकारशक्ती मजबूत असणे फार गरजेचे आहे. तसेच शरीरातील व्हिटामिन सीच्या गरजेपेक्षा 200% अधिक व्हिटामिन सी केवळ पपईमुळे मिळू शकते.

▮ **मधुमेहींसाठी गुणकारी-** पपई चवीला गोड असली तरीही त्यामुळे रक्तातील साखर वाढत नाही. कपभर पपईच्या तुकड्यांमधून केवळ 8.3 ग्रॅम साखर असते. यामुळे मधुमेहींनी पपई खाणे हितकारी आहे. तसेच पपई खाल्ल्याने मधुमेह जडण्यापासून बचाव होतो.

▮ **डोळ्यांचे आरोग्य सुधारते-** पपईमध्ये व्हिटामिन ए मुबलक प्रमाणात आढळते. डोळ्यांचे आरोग्य राखण्यासाठी व्हिटामिन ए अत्यंत गरजेचे आहे. वाढत्या वयानुसार दृष्टी कमी होण्याची शक्यता असते. या समस्येपासून बचावण्यासाठी पपईचा आहारात समावेश करावा.

▮ **सांधेदुखीपासून आराम मिळतो-** पपईमध्ये व्हिटामिन सी प्रमाणेच वेदनाशामक गुणधर्म असल्याने सांधेदुखीच्या रुग्णांना पपईचे सेवन फारच हितकारी आहे. पपईतील व्हिटामीन सी घटक सांध्यांना मजबुती देण्यास तसेच सूज कमी करण्यास मदत करतात.

▮ **पचन सुधारते-** आजकालच्या व्यस्त जीवनशैलीमुळे जंक फूड किंवा बाहेरचे जेवण टाळणे हे काहीसे कठीण आहे. त्यामुळे अशा खाण्याने पचनशक्ती बिघडण्याची शक्यता असते. अशावेळी पपई खाल्ल्याने अरबट-चरबट खाल्ल्याने होणारे दुष्परिणाम टाळण्यास मदत होते. पपईतील पपैन नामक एंजाईम पचन कार्य सुधारते.

▮ **मासिक पाळीचा त्रास कमी होतो-** अनियमित मासिक पाळी तसेच मासिक पाळीच्या काळातील त्रास अशा समस्या दूर करण्यासाठी पपई फारच उपयुक्त आहे.

▮ **कर्करोगापासून बचाव होतो-** पपईमधील ॲन्टीऑक्सिडंट घटक शरीरातील फ्री रॅडीकल्सपासून तुमचा बचाव करते. तसेच पपईतील बीटा कॅरोटीन आतड्यांच्या कर्करोगापासून बचाव करते.

▮ **ताण-तणाव कमी होतो -** दिवसभराच्या धावपळीनंतर वाटीभर पपईचे काप खाल्ल्यास थकवा कमी होण्यास मदत होते. तसेच व्हिटामिन सी शरीरातील हार्मोन्सचे प्रमाण संतुलित राखते.



'खरवस'

साहित्य- १ लिटर पहिल्या दिवसाचा दुधाचा चिक (खाली महत्त्वाची टिप नक्की वाचा), १ लिटर दुध, दोनशे ते अडीचशे ग्राम साखर (साधारण १ पाणी प्यायचे फुलपात्र), २-३ चिमटी केशर, १/२ टीस्पून वेलचीपूड, मोठा कुकर, २ कुकरच्या आतील डबे

कृती- तव्केशर अगदी थोडे कोमट करून पाव वाटी दुधात भिजत घालून ठेवावे. चिक आणि दुध एकत्र करून त्यात साखर घालावी. साखर विरघळेस्तोवर ढवळावे. चव पाहून लागल्यास अजून साखर घालावी. केशर आणि वेलची पूड घालून मिक्स करावे. तयार मिश्रण कुकरमध्ये भात शिजवतो तसेच शिजवून घ्यावे. कुकरचे २ मोठे डबे घ्यावे. डब्यात तयार मिश्रण सारखे विभागून घालावे. कुकरच्या तळाशी दीड इंचभर पाणी घालावे. एक डबा अलगदपणे पकडीच्या मदतीने आत ठेवावा. त्यावर ताटली ठेवावी. त्याच्या डोक्यावर अजून एक डबा ठेवावा. वर अजून एक ताटली ठेवावी. झाकण लावून २ शिट्ट्या कराव्यात. आच बारीक करून मिनिटभराने बंद करावी. ५-८ मिनिटांनी कुकरचे प्रेशर गेल्यावर झाकण काढून दोन्ही डबे बाहेर काढावेत. गार होईस्तोवर हवेवर उघडेच ठेवावे. कोमटसर झाले की खाल्ले तरी चालते. पण फ्रीजमध्ये गार करून खाल्ल्यास अजून स्वादिष्ट लागतात. खरवस फ्रीजमध्ये ८ दिवस सहज टिकतो.



आता डेस्कटॉपवरून करा व्हॉट्सऍप व्हिडिओ आणि ऑडियो कॉल

व्हॉट्सऍप कंपनी आपल्या यूजर्ससाठी नेहमीच नवीन फीचर्स आणते. आता कंपनी नवीन फीचर्स वर काम करीत आहे. व्हॉट्सऍप यूजर्सला आता डेस्कटॉपवरून सुद्धा कॉल करता येणार आहेत. या कॉलमध्ये ऑडियो आणि व्हिडिओचा समावेश असेल.



व्हॉट्सऍप ने डेस्कटॉपसाठी अनेक फीचर्स आणले आहेत. परंतु, दोन फीचर्सची कमतरता अजूनही जाणवत आहे. पहिले आहे डेस्कटॉप वर व्हॉट्सऍप कॉल करणे आणि दुसरे डेस्कटॉपवर व्हिडिओ किंवा किंवा ऑडियो करणे. यातील एका फीचरची कमतरता आता जाणवणार नाही. खरं म्हणजे व्हॉट्सऍप ने विंडोजसाठी एक नवीन ऍप आणला आहे. हा ऍप वेगाने लोड होते. तसेच सहज इंटरफेस सोबत येते. याच्या मदतीने व्हॉट्सऍप आपल्या यूजर्सला जास्तीत जास्त ८ लोकांसोबत ग्रुप व्हिडिओ कॉल आणि ३२ लोकांसोबत ऑडियो कॉल करण्याची सुविधा देते.

मैक ओएस ला ही सुविधा मिळणार

समोर आलेल्या माहितीनुसार, फक्त विंडोजचा यात समावेश करण्यात आला आहे. परंतु, हे फीचर मॅकबॅकच्या यूजर्ससाठी उपलब्ध केले जाणार आहे. कारण, सध्या मॅक डेस्कटॉप व्हर्जन बीटा टेस्टिंग मध्ये आहे. नुकत्याच एका ब्लॉग पोस्टमध्ये मेटाने म्हटले की, विंडोजच्या इंस्टेंट मेसेजिंग ऍप व्हॉट्सऍपला नवीन फीचर्स सोबत एक नवीन लूक मिळाले आहे. मेटाने म्हटले की, आम्ही विंडोजसाठी एक नवीन व्हॉट्सऍप ऍप आणले जात आहे. जे वेगाने लोड होईल. या ऍप सोबत मोबाइल व्हर्जनच्या सारखे इंटरफेस सोबत येईल.

डेस्कटॉपवर व्हॉट्सऍप कॉल कसा कराल?

डेस्कटॉपवर व्हॉट्सऍप च्या माध्यमातून व्हिडिओ किंवा ऑडियो कॉल करण्याची सुविधा अपडेट सोबत उपलब्ध आहे. या सुविधेचा लाभ घेण्यासाठी तुम्हाला डेस्कटॉप व्हॉट्सऍप ऍपला अपडेट करावे लागणार आहे. अपडेट करण्यात आल्यानंतर तुम्हाला मोबाइल इंटरफेस प्रमाणे व्हिडिओ कॉल आणि ऑडियो कॉलचे आयकॉन दिसेल.

पोळीला तूप लावून खाणे आरोग्यास लाभदायक



हेल्दी राहण्यासाठी शरीरास सकस आहाराची फार गरज असते. आताच्या काळात सर्वांना फास्ट फूड जास्त आवडतात, त्यामुळे रोजच्या आहाराकडे दुर्लक्ष होते. फास्ट फूड आणि तेलकट पदार्थ आरोग्यास घातक असतात. कित्येक लोक पोळ्या बनवण्यासाठी तेल किंवा डालड्याचा उपयोग करतात. तर पोळ्या बनवण्यासाठी तूपाचा वापर शरीरास अधिक लाभदायक आहे. तूपामध्ये अनेक प्रकारचे पोषक तत्वे असतात. तुम्हाला वाटत असेल, तूप खाल्याने वजन वाढतं तर हा एक गैरसमज आहे.

▮ वजन कमी करण्यासाठी तूपाची मदत होते.

▮ तूप आपल्या शरीरातील मेटाबॉलिज्म वाढवण्यास मदत करतो. त्यामुळे वजन कमी करण्यास मदत होते.

त्वचेसाठी लाभदायक तूप

तूपामध्ये एन्टीऑक्सीडेंट घटक असतात ते त्वचेसाठी फार फायदेशीर असतात. त्याचप्रमाणे त्वचेमध्ये असलेले डेड सेल्स तूपाच्या नियमित सेवनाने नष्ट होतात.

पनीर बाजारातून गायब होतंय

अन्न व औषध प्रशासनाच्या कारवाईचा असाही धसका?

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक



गेल्या काही दिवसांपासून अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) भेसळीविरोधात जोरदार कारवाई सुरु केली आहे. त्यामुळे बाजारातील भेसळयुक्त पदार्थ आता बाजारातून कमी होण्यास सुरुवात झाली आहे. कालपर्यंत हॉटेल, रेस्टॉरंट आणि ढाब्यांमधील मेन्यू कार्डवर ठळकपणे झळकणारे पनीरचे विविध पदार्थ अचानक अनेक ठिकाणी गायब झाल्याचे चित्र आहे. व्यावसायिकांकडून पनीरचा तुटवडा असल्याचे उत्तर दिले जात असले तरी या घडामोडीमागे केवळ पुरवठ्याची समस्या नसून भेसळीविरोधात वाढलेल्या कारवायांचा प्रभाव असल्याची चर्चा रंगू लागली आहे.

अन्न व औषध प्रशासनाच्या कारवाईचा धसका?

अन्न व औषध प्रशासनाने भेसळयुक्त अन्नपदार्थांविरोधात विशेष मोहीम हाती घेतल्यानंतर विविध भागांतून बोगस पनीर, कृत्रिम दूध आणि भेसळयुक्त दुग्धजन्य पदार्थांवर कारवाईच्या घटना समोर आल्या आहेत. तपासणी पथकांनी अनेक ठिकाणी छापे टाकून नमुने जप्त करत प्रयोगशाळांमध्ये त्यांची तपासणी सुरू आहे. काही ठिकाणी संशयास्पद पदार्थांचा साठाही जप्त करण्यात आला आहे. त्यामुळे संबंधित व्यावसायिकांमध्ये धास्तीचे वातावरण निर्माण झाल्याचे दिसून येत आहे.

आता शहरांमध्ये इतरही बऱ्याच दुग्धजन्य पदार्थांची बारमाही विक्री करणारे स्टॉल आधीच्या तुलनेत कमी प्रमाणात दिसत आहेत. काही ठिकाणी हे पदार्थ पूर्णपणे गायब झाले आहेत. त्यामुळे ग्राहकांमध्ये संशयाचे वातावरण निर्माण झाले असून, इतके दिवस बाजारात उपलब्ध असलेल्या पदार्थांच्या गुणवत्तेबाबत प्रश्न उपस्थित होऊ लागले आहेत.

बनावट पनीर, आरोग्याला धोका

तज्ज्ञांच्या मते, दजेदार पनीर तयार करण्यासाठी मोठ्या प्रमाणात शुद्ध दुधाची आवश्यकता असते. दूध, वीज, प्रक्रिया आणि वाहतूक खर्चामुळे त्याची निर्मिती तुलनेने महाग ठरते. मात्र, काही भेसळखोरांकडून कृत्रिम घटक, खाद्यतेल, स्टार्च, सिंथेटिक रसायने आणि इतर निकृष्ट दर्जाच्या साहित्याचा वापर करून बनावट पनीरसदृश पदार्थ तयार केल्याचे यापूर्वीच्या कारवायांमधून समोर आले आहे. अशा पदार्थांची निर्मिती कमी खर्चात होत असल्याने त्यांची बाजारात मोठ्या प्रमाणावर विक्री केली जात असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

आरोग्य तज्ज्ञांनीही अशा भेसळयुक्त पदार्थांबाबत गंभीर इशारा दिला आहे. निकृष्ट दजार्चे किंवा रासायनिक घटक मिसळलेले पनीर व दुग्धजन्य पदार्थ नियमित सेवन केल्यास पचनसंस्थेचे विकार, विषबाधा, यकृत आणि मूत्रपिंडांवरील दुष्परिणाम तसेच इतर गंभीर आरोग्य समस्या उद्भवू शकतात. त्यामुळे ग्राहकांनी पदार्थ खरेदी करताना दर्जा, स्त्रोत आणि विश्वसनीयता तपासण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

पेपरफुटीविरोधात 'कॉक्रोच जनता पार्टी'चे सावित्रीबाई फुले विद्यापीठात भव्य आंदोलन

शिक्षणमंत्र्यांचा राजीनामा आज, युवा एकता झिंदाबाद, अशा घोषणा

■पुणे। प्रतिनिधी,

परीक्षेचा पेपर फुटल्यास प्रत्येक विद्यार्थ्याला शासनाकडून दहा हजार ऊपये आर्थिक नुकसानभरपाई मिळावी, परीक्षा आयोजित करण्यासाठी टेंडर घेणाऱ्या कंपन्यांचे कडक ऑडिट व्हावे, मंत्र्यांच्या नातलगांना वा जवळच्या मित्रांना अशी टेंडर मिळता कामा नयेत तसेच एनसीईआरटीच्या पाठ्यापुस्तकातून वगळलेला छत्रपती शिवाजी महाराजांच्या 'हिंदवी साम्राज्याचा नकाशा' पुन्हा समाविष्ट करण्यात यावा, यांसह अन्य मागण्यांचे ठराव कॉक्रोच जनता पार्टीच्या आंदोलनात गुरुवारी मांडण्यात आले. विद्यार्थ्यांचा एकच आवाज; शिक्षणमंत्र्यांचा राजीनामा आज, युवा एकता झिंदाबाद, अशा घोषणा देत 'कॉक्रोच जनता पार्टी'च्या बॅनरखाली एकवटलेल्या हजारो विद्यार्थी व युवकांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा परिसर गुरुवारी दणाणून सोडला. नीट परीक्षेतील पेपरफुटी आणि सीबीएसई परीक्षांमधील गोंधळावरून देशभरातील विद्यार्थ्यांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. याप्रकरणी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून तातडीने राजीनामा द्यावा, या मागणीसाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यासमोर 'कॉक्रोच जनता पार्टी'च्या वतीने अभिजीत दीपके आणि सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचूक यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात सामाजिक कार्यकर्ते डॉ. विश्वंभर चौधरी. ॲड असीम सरोदे, नामदेवराव जाधव यांच्यासह पुण्याच्या सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील अनेक मंडळींनी सहभाग घेतला.



हक्कासाठी लढणे म्हणजे अराजकता का?: दीपकेंचा मुख्यमंत्र्यांना टोला

अभिजीत दीपके यांनी आपल्या भाषणात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वक्तव्याचा खरपूस समाचार घेतला. आंदोलनात सहभागी झालेले लोक समाजात अराजकता पसरवत आहेत, असे मुख्यमंत्री महोदय म्हणतात. मला मुख्यमंत्र्यांना विचारायचे आहे, की हक्कासाठी लढणे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव घेणे म्हणजे अराजकता पसरवणे आहे का? आम्हाला संविधान माहीत आहे का, असेही ते विचारतात. मात्र, चोरून पहाटेचा शपथविधी पार पाडणे कोणत्या संविधानात लिहिले आहे, असा टोलाही दीपके यांनी लगावला.

त्याचबरोबर विद्यार्थी, विद्यार्थिनीही यात मोठ्या संख्येने सहभागी झाले.

विद्यार्थ्यांसह ज्येष्ठांचाही लक्षणीय सहभाग

दुपारी चारच्या सुमारास आंदोलनाला सुरुवात झाली. विद्यार्थी, विद्यार्थिनींबरोबरच ज्येष्ठांचाही यातील सहभाग उठून दिसत होतात. विद्यार्थ्यांच्या हातात असलेल्या फलकांवरील मजकूर प्रत्येकाचे लक्ष वेधून घेत होता. पेपर लीक सरकार, लीक इन इंडिया, आमचे भविष्य आमचा अधिकार, सर्वांना शिक्षण, सर्वांना काम, असा आशय या फलकांवर लिहिलेला होता. या वेळी विद्यार्थ्यांकडून जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

अन् विद्यार्थ्यांची गर्दी उसळली


धर्मेंद्र प्रधान राजीनामा द्या, नरेंद्र मोदी उत्तर द्या, युवा एकता झिंदाबाद, यांसारख्या घोषणांनी विद्यार्थ्यांनी विद्यापीठाचा परिसर दणाणून सोडला. पावणे सहाच्या सुमारास सोनम वांगचूक यांचे आंदोलनस्थळी आगमन झाले. त्यानंतर अभिजित दीपके हेदेखील आंदोलनाच्या ठिकाणी दाखल झाले. त्या वेळी विद्यार्थ्यांची मोठी गर्दी उसळली. तरुणांचा उत्साह टीपेला पोहोचला. मंत्र्यांच्या नातलगांना परीक्षांचे टेंडर नको आंदोलनामध्ये प्रामुख्याने पाच मागण्या करण्यात आल्या. पेपर फुटल्यास विद्यार्थ्यांना दहा हजार रुपये नुकसान भरपाई द्यावी, परीक्षा प्रक्रियेत कडक ऑडिट व्हावे, मंत्र्यांच्या नातेवाईकांना टेंडर देऊ नयेत, परीक्षेचा निकाल एका ठराविक मुदतीतच जाहीर झाला पाहिजे, विद्यार्थ्यांचा परीक्षा केंद्रावर येण्या-जाण्याचा वाहतूक खर्च शासनाने उचलावा, तसेच एनसीईआरटीच्या पाठ्यापुस्तकातून वगळलेला छत्रपती शिवाजी महाराजांच्या 'हिंदवी साम्राज्याचा नकाशा' पुन्हा समाविष्ट करण्यात यावा, या मागण्यांचे ठराव या वेळी मंजूर करण्यात आले.

धार्मिक द्वेषाला बळी पडणार नाही

सरकारचे धार्मिक राजकारण यापुढे चालणार नाही. तऊण पिढी कोणत्याही हिंदू-मुस्लीम किंवा धार्मिक द्वेषाच्या राजकारणाला बळी पडणार नाही, असा निर्धारही या वेळी व्यक्त करण्यात आला.

गुरू - शिष्याच्या नात्याला काळिमा!

शिक्षकाने 5 विद्यार्थिनींवर केले लैंगिक अत्याचार



■नागपूर। प्रतिनिधी,

गुजराताच्या राजकोटमधील उपलोटा येथे एक खळबळजनक घटना उघडकीस आली. एका सरकारी शाळेतील शिक्षकाने सर्व मयार्दा ओलांडल्या. आरोपी शिक्षकाने तब्बल 5 विद्यार्थिनींवर लैंगिक अत्याचार केला. या घटनेनं परिसरात संतापाची लाट उसळली. संबंधित प्रकरणात पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे. आरोपीची ओळख देवानंद गोवाभाई बोरा असल्याचे सांगण्यात येते.

शिक्षकाने 5 विद्यार्थिनीवर लैंगिक अत्याचार

क्रूरतेच्या बळी पडलेल्या पाच निष्पाप विद्यार्थिनींचं वय वर्षे सहा ते सात दरम्यान असल्याचे सांगण्यात येते. आरोपीची देवानंद बेरा अशी ओळख असून आरोपी शिक्षकाला अटक करण्यात आली. संबंधित घटनेची माहिती मिळताच स्थानिक प्रशासन आणि पोलिसांनी तात्काळपणे पोलीस कारवाई केली. पोलीस अधीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली पटनवाव पोलीस ठाण्याच्या पथकाने हे प्रकरण गांभीयार्ने घेतले आणि या प्रकरणाची शोधमोहिम केली.

आरोपी शिक्षकावर गुन्हा दाखल

प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेत पोलिसांनी शिक्षकाविरूद्ध भारतीय दंड संहिता आणि बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्याच्या कलमांन्वये गुन्हा दाखल केला. जखमी झालेल्या पीडित विद्यार्थिनींची वैद्यकीय तपासणी केली जाणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे, या घटनेनं परिसर हादरून गेला आहे.

संबंधित घटनेबाबत मुलींच्या कुटुंबीयांचीही करण्यात आली आहे. शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनाही माहिती देण्यात आली. याच घटनेनं पीडित कुटुंबीयांनाच नाही,तर स्थानिकांना देखील मोठा धक्का बसला आहे. आरोपींना कठोर शिक्षा व्हावी अशी नागरिकांची मागणी करण्यात आली आहे.

गर्लफ्रेंडसोबत अश्लील व्हिडीओ बनवून मित्रांना दाखवला, अन्...

■मुंबई। प्रतिनिधी,

एका 17 वर्षीय अल्पवयीन मुलीचे लैंगिक शोषण आणि ब्लॅकमेलिंग करण्यात आले आहे. या प्रकरणातील मुख्य आरोपी 30 वर्षीय होरी लाल चौहान हा आहे, जो पीडित तरुणीच्याच गावातील असून तो मजूर म्हणून काम करतो. गेल्या दोन वर्षापासून या दोघांमध्ये प्रेमसंबंध होते, याचा गैरफायदा घेत आरोपीने त्यांच्यातील शारीरिक संबंधांचे खासगी व्हिडिओ चोरून रेकॉर्ड केले. या धक्कादायक कृत्यानंतर त्याने हे व्हिडिओ आपल्या मित्रांना दाखवून तरुणीच्या जिवाशी खेळण्याचा प्रकार सुरू केला.

धमकी देऊन शारीरिक संबंध ठेवण्यासाठी भाग पाडले

आरोपी होरी लाल याने आपल्या मित्रांसोबत मिळून पीडित तरुणीला ब्लॅकमेल करण्यास सुरुवात केली. त्याने आपल्या मित्रांना व्हिडिओ दाखवल्यामुळे हे सर्व तरुण तरुणीवर दबाव टाकू लागले. या नराधमांनी तिला व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी देऊन शारीरिक संबंध ठेवण्यासाठी भाग पाडले. इतकेच नाही तर, हे आरोपी तरुणीला घाणेरडे इशारे करून मानसिकदृष्ट्या त्रास देऊ लागले. जेव्हा पीडितेने या अत्याचाराला विरोध करण्याचा प्रयत्न केला, तेव्हा तिला वारंवार जीवे मारण्याची आणि बदनामी करण्याची धमकी दिली गेली. या सततच्या त्रासामुळे तरुणी पूर्णपणे खचून गेली होती.

पॉक्सो कायद्यांतर्गत गुन्हे दाखल

या भीषण मानसिक आणि शारीरिक छळाला कंटाळून अखेर पीडित मुलीने धीर एकवटला आणि ही सर्व आपबिती आपल्या भावाला सांगितली. भावाने घटनेचे गांभीर्य ओळखून तातडीने बालको नगर पोलीस ठाण्यात धाव घेतली आणि या नराधमांविरुद्ध तक्रार दाखल केली. तक्रार प्राप्त होताच पोलिसांनी तत्काळ हालचाली सुरू केल्या. पीडितेच्या तक्रारीवरून पोलिसांनी मुख्य आरोपी होरी लाल चौहानसह सर्व संबंधित आरोपींविरुद्ध बलात्कार, ब्लॅकमेलिंग आणि पॉक्सो कायद्यांतर्गत गंभीर गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणामुळे संपूर्ण परिसरात संतापाची लाट उसळली असून, नागरिकांकडून आरोपींवर कठोर कारवाईची मागणी होत आहे. छत्तीसगडमधील कोरबा जिल्ह्यातून माणुसकीला काळीमा फासणारी ही अत्यंत संतापजनक घटना समोर आली आहे.

पोलीस प्रशासनाने या प्रकरणाचा तपास अधिक गतिमान केला असून, गुन्ह्यात सामील असलेल्या इतर आरोपींचा शोध घेतला जात आहे. पीडितेची वैद्यकीय तपासणी आणि इतर कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केली जात असून, पोलीस या प्रकरणाचे सर्व पैलू तपासत आहेत. अल्पवयीन मुलीवर झालेला हा अन्याय पाहून सामाजिक संघटनांनीही या घटनेचा निषेध केला आहे. आरोपींना लवकरात लवकर अटक करून त्यांना कठोर शिक्षा मिळवून देण्यासाठी पोलीस कटिबद्ध असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे. अशा प्रकारच्या विकृत प्रवृत्तींपासून सावध राहण्याचे आवाहनही आता पोलीस यंत्रणेकडून करण्यात येत आहे.



मुलीला बाहेर काढलं अन् दरवाजा लावून आशा वर्करसोबत...

■मुंबई। प्रतिनिधी,

एका थरारक घटनेने संपूर्ण परिसर हादरून गेला आहे. 37 वर्षीय आशा कार्यकर्त्या रजनी शुक्ला यांचा त्यांच्याच घरात संशयास्पद मृत्यू झाल्याचे समोर आले. या संपूर्ण प्रकरणात सुरेंद्र उर्फ सीताराम तिवारी नावाच्या एका युवकाचे नाव समोर आले असून, धक्कादायक बाब म्हणजे तो युवकही त्याच घरात मृतावस्थेत आढळून आला. या दुहेरी मृत्यूच्या घटनेमुळे संपूर्ण परिसरात प्रचंड खळबळ उडाली आहे. मध्य प्रदेशातील पन्ना जिल्ह्यातील ही घटना आहे.

दरवाजा बंद केला अन्...

मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना घडली तेव्हा रजनी शुक्ला यांची 17 वर्षाची मुलगी घरातच हजर होती. आरोपी सुरेंद्र याने मुलीला खोलीतून ओढत बाहेर काढले आणि घराचा दरवाजा आतून घट्ट बंद करून घेतला. यानंतर त्याने रजनी यांच्यावर



एकामागून एक सपासप वार करत जीवघेणा हल्ला चढवला. या भीषण हल्ल्यात अत्यंत तडफडून रजनी यांचा जागेवरच मृत्यू झाला. मात्र, हे हत्याकांड घडवून आणल्यानंतर आरोपीने पोलीस आणि कायद्याच्या भीतीने त्याच खोलीत सल्फासच्या गोळ्या खाऊन आपली जीवनयात्रा संपवली.

नागरिकांनी केली गर्दी

घाबरलेल्या मुलीने तातडीने या घटनेची माहिती पोलिसांना दिली. माहिती मिळताच पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी बंद दरवाजा तोडून घरात प्रवेश केला असता, त्यांना रजनी शुक्ला आणि सुरेंद्र उर्फ सीताराम तिवारी या दोघांचेही मृतदेह आढळून आले. या घटनेची माहिती वाऱ्यासारखी पसरताच घटनास्थळी नागरिकांची मोठी गर्दी जमली होती. पोलिसांनी दोन्ही मृतदेह ताब्यात घेऊन पोस्टमार्टमससाठी रुग्णालयात पाठवले असून घटनास्थळाचा पंचनामा केला आहे.

नेमकं कारण काय?

या दुर्दैवी आणि अंगावर काटा आणणाऱ्या घटनेमुळे स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. आशा वर्करच्या हत्येमागील आणि आरोपीच्या आत्महत्येमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट होऊ शकलेले नाही. पोलीस सध्या मृत महिलेच्या कुटुंबीयांची आणि आजूबाजूच्या लोकांची कसून चौकशी करत असून विविध बाजूंनी या प्रकरणाचा तपास सुरू आहे. संपूर्ण पोलीस तपास पूर्ण झाल्यानंतरच या हत्याकांडामागचे खरे रहस्य समोर येऊ शकेल, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

प्रेयसीचा लग्नासाठी दबाव, प्रियकराने मित्रांना बोलावलं अन्...

चौघांना अटक

पोलिसांनी तांत्रिक आणि वैज्ञानिक पुराव्यांच्या आधारे तपास चक्रावून या गुन्ह्यातील मुख्य सूत्रधार सुरज कुमार (19), पवन महतो (21), राहुल भुईया (19) आणि रोहित कुमार महतो (19) या चारही आरोपींना अटक केली आहे. हे सर्व आरोपी रांची जिल्ह्यातील मनातू गावचे रहिवासी आहेत. अटक केलेल्या आरोपींच्या माहितीवरून पोलिसांनी घटनास्थळावरून मृत महिलेची चप्पल, हत्येसाठी वापरलेला चाकू, वीट आणि गुन्ह्यात वापरलेली मोटारसायकल जप्त केली आहे. हे सर्व पुरावे पुढील फॉरेन्सिक तपासणीसाठी पाठवण्यात आले असून पोलीस या प्रकरणी पुढील कायदेशीर कारवाई करत आहेत.

■मुंबई। प्रतिनिधी,

नदीच्या वाळूत पुरलेल्या अवस्थेत आढळलेल्या अज्ञात महिलेच्या मृतदेहाचे गूढ उकलण्यात पोलिसांना यश आले आहे. या खळबळजनक हत्याकांडात प्रेमसंबंध, लग्नाचा दबाव, सामूहिक बलात्कार आणि हत्येचा धक्कादायक कट समोर आला आहे. या प्रकरणी पोलिसांनी चार आरोपींना अटक केली असून त्यांच्याकडून गुन्ह्यात वापरलेले साहित्यही जप्त केले आहे. 6 जून रोजी सफी नदीच्या पात्रात वाळूखाली लपवून ठेवलेला महिलेचा मृतदेह सापडल्यानंतर पोलिसांनी तपास सुरु केला होता. या तपासात फॉरेन्सिक सायन्स लॅबोरेटरीच्या पथकाचीही मदत घेण्यात आली. झारखंडमधील चतरा येथील हे प्रकरण आहे.

यात्रेला जाते म्हणून बाहेर पडली अन्...

मिळालेल्या माहितीनुसार, फॉरेन्सिक पथकाकडून मिळालेले सुगावे आणि तांत्रिक पुराव्यांच्या आधारे मृत महिलेची ओळख पटवण्यात आली. ती महिला रांची जिल्ह्यातील रातू पोलीस ठाण्याच्या हद्दीतील राहणारी होती. तपासात समोर आले की, ती 1 जून रोजी घरातून यात्रेला जात असल्याचे सांगून बाहेर पडली होती. तिच्या मोबाईल कॉल्स आणि संपर्काचा तपास केला असता, रांची जिल्ह्यातील खलारी परिसरातील सुरज कुमार याच्यासोबत तिचे प्रेमसंबंध असल्याचे उघड झाले. महिला सुरजवर लग्नासाठी सातत्याने दबाव टाकत होती आणि लग्न न केल्यास कायदेशीर कारवाईची धमकीही देत होती.

सामूहिक बलात्कार अन् हत्या

याच लग्नाच्या दबावाला कंटाळून सुरज कुमारने आपल्या मित्रांच्या मदतीने महिलेच्या हत्येचा कट रचला. योजनेनुसार, 1 आणि 2 जूनच्या मध्यरात्री महिलेला मांडा जत्रा फिरवण्याच्या आणि लग्नाबाबत चर्चा करण्याच्या बहाण्याने पंडरियाच्या जंगलात बोलावण्यात आले. तिथे आधीच दबा धरून बसलेल्या सुरजच्या साथीदारांनी म्हणजेच राहुल भुईया आणि रोहित कुमार महतो यांनी जंगलात महिलेवर बलात्कार केला. त्यानंतर आरोपींनी चाकू आणि विटांनी वार करून तिची निर्घृण हत्या केली. हत्येचा पुरावा नष्ट करण्यासाठी आणि कोणाला संशय येऊ नये म्हणून त्यांनी मृतदेह सफी नदीच्या किनाऱ्यावर नेऊन वाळूत पुरून टाकला.



शारीरिक संबंध ठेवले तर मुलाचा आजार... विकृत बाबाचं भयंकर कृत्य!

अंधश्रद्धेच्या आहारी जाऊन लोकांच्या भावनांशी खेळणाऱ्या आणि अशा प्रकारे गुन्हा करणाऱ्या तांत्रिकावर कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडितेची वैद्यकीय तपासणी आणि इतर कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केली जात आहे. पोलीस प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, दोषी व्यक्तीला न्यायालयात कठोर शिक्षा मिळवून देण्यासाठी सर्व आवश्यक पुरावे गोळा केले जात आहेत. या घटनेमुळे पुन्हा एकदा अंधश्रद्धेचे भयानक वास्तव समोर आले असून, अशा नराधम तांत्रिकांपासून सावध राहण्याचे आवाहन पोलीस प्रशासनाकडून करण्यात आले आहे. उत्तर प्रदेशातील देवरिया जिल्ह्यातून ही धक्कादायक घटना समोर आली आहे.

■मुंबई। प्रतिनिधी,

महिला आपल्या मुलाच्या आजारपणामुळे अत्यंत त्रस्त होती. मुलाच्या सततच्या आजारपणावर उपाय शोधण्यासाठी तिने गावातीलच एका तांत्रिकाकडे जाण्याचा निर्णय घेतला. हा तांत्रिक, ज्याचे नाव व्यासमुनी पांडेय असे आहे, तो लोकांच्या अंधश्रद्धेचा फायदा घेऊन पूजा वगैरे करून आजार बरे करण्याचा दावा करायचा. हताश झालेली ती महिला आपल्या आजारी मुलाला घेऊन विश्वासाने तांत्रिकाच्या घरी पोहोचली, मात्र तिला काय माहित होते की तिथे तिचा आणि तिच्या विश्वासाचा भीषण गैरफायदा घेतला जाणार आहे.

नराधम तांत्रिकाचा महिलेवर बलात्कार

तांत्रिकाने महिलेला पाहून तिची परिस्थिती ओळखली आणि तिला आपल्या जाळ्यात ओढण्यास सुरुवात केली. त्याने महिलेला सांगितले की, मुलाची प्रकृती ठीक होण्यासाठी एक विशेष विधी करणे आवश्यक आहे. अत्यंत विकृत वृत्तीचा परिचय देत तांत्रिकाने महिलेला अमिष दाखवले की, जर तिने त्याच्याशी शारीरिक संबंध प्रस्थापित केले, तरच तिचे मूल पूर्णपणे बरे होईल. मुलाच्या प्रेमापोटी आणि त्याच्या आरोग्याच्या चिंतेने ग्रासलेल्या महिलेला त्या तांत्रिकाच्या कपट कारस्थानाचा अंदाज आला नाही. याच संधीचा फायदा घेऊन त्या नराधम तांत्रिकाने महिलेवर बलात्कार केला. ही घटना उघडकीस आल्यानंतर संपूर्ण परिसरात संतापाची लाट पसरली आहे.

बाबाला पोलिसांनी ठोकल्या बेड्या

पीडित महिलेने या घटनेची माहिती मिळताच धाडस दाखवून पोलिसांकडे धाव घेतली आणि आरोपी तांत्रिकाविरुद्ध तक्रार दाखल केली. या तक्रारीची दखल घेत देवरिया पोलिसांनी त्वरित कारवाई सुरू केली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, 7 जून 2026 रोजी त्यांना या प्रकरणाची सूचना मिळाली होती. तातडीने पोलीस पथक घटनास्थळी रवाना झाले आणि आरोपी व्यासमुनी पांडेय याला ताब्यात घेण्यात आले. बनकटा पोलीस ठाण्यात या नराधमावर विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याला अटक करण्यात आली आहे. पोलीस आता या प्रकरणाचा सखोल तपास करत आहेत.



3 मुलांच्या आईला लग्नाची मागणी केली, नंतर शरीरसंबंध ठेवत...

■मुंबई। प्रतिनिधी,

तीन विधवा मुलांच्या आईला लग्नाचे आमिष दाखवून तिच्यावर लैंगिक अत्याचार करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. पीडितेच्या तक्रारीवरून पोलीस ठाण्यात आरोपीविरोधात लैंगिक अत्याचाराचा गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणाचा पोलीस पुढील तपास करत आहेत. या धक्कादायक प्रकार हरयाणातील पलवल येथील गदपुरी ठाणे क्षेत्रात घडली.

3 मुलांच्या आईवर लग्नाची जबरदस्ती अन् नको तेच

पीडित महिलेच्या पतीचा मृत्यू झाला असून तिला दोन मुलं आणि एक मुलगी आहे. मुलांच्या भविष्यासाठी तसेच त्यांच्या पालनपोषणासाठी ती एका खाजगी कंपनीत काम करते. त्याच कंपनीत नोकरी करणारा नूंह जिल्ह्यातील एक तरुण तिथे नोकरी करत होता. त्या तरुणाची अन्सार अली अशी ओळख पटली. तो तरुण तिचा सतत पाठलाग करू लागला होता, हळूहळून दोघांमध्ये संभाषण सुरू झालं.

अन्सारी अलीने महिलेला विश्वासात घेतलं आणि लग्नाची मागणी केली. यावरून अनेकदा दोघांमध्ये वाद घडला होता. लग्नाचे आमिष दाखवून आरोपी अन्सारी अलीने आपल्या जाळ्यात ओढत तिच्याशी शरीरसंबंध ठेवले.

आरोपीने राजीनामा देऊन कर्मचाऱ्यांना फोन करून सांगितलं

दरम्यान, आरोपीने तिच्याशी विवाह करण्यास जबरदस्ती केली, तेव्हा त्याने आजारी असल्याचं नाटक सांगून दोन दिवस रजेवर असल्याचे सांगितलं. जेव्हा महिला कंपनीत परतली तेव्हा तिला कळले की, आरोपीने राजीनामा देऊन नोकरी सोडली. नोकरी सोडल्यानंतर आरोपीने इतर अनेक कर्मचाऱ्यांना फोन करून याबाबत सांगितलं.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com